JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

उपवासाची कारणे अनेक,
शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

Volume - 73 | Issue- 183 | Marathi Daily | Tuesday 25/3/2025 | Pages - 4+4 | Price- Rs. 3





कर्तबगार तोचि महान।
कर्मयोगी तयाचा सन्मान॥

॥ कर्मयोगी ॥

आमचे मार्गदर्शक व गुरु
मा. आमदार
अरुणकाका जगताप
आपणांस वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !



शुभेच्छुक
दयानंद बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स
मे.ए.बी.जाधव (एमईएस कॉन्ट्रॅक्टर)

मा. श्री. अनिल जाधव
अध्यक्ष, दयानंद ग्रुप अॅण्ड इंडस्ट्रिज

संपादकीय

# व्यापारसंधी जपताना...

अलिकडे काही देशांमधील युद्धजन्य परिस्थिती, युरोपमधील अस्थिरता आणि अमेरिकेच्या बदललेल्या तसेच 'अमेरिका फर्स्ट' धोरणाच्या कठोर अंमलबजावणीच्या परिणामस्वरुप जवळपास सर्वच राष्ट्रांची बाहेरुन घेतलेली कर्जे वाढत आहेत. अशा वाढीव कर्जांचा भार पडल्यामुळे त्यांचे उत्पादन आणि मागणी–पुरवठ्याची स्थिती प्रभावित झाली असून अर्थव्यवस्था गर्तेत जाण्याचा धोका आहे. या स्थितीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज जाणवते. अलिकडे कामगारांच्या विविध क्षेत्रांमध्ये बरेच बदल झाले आहेत. काही क्षेत्रातील कामगारांना चांगले दिवस आहेत तर काही क्षेत्रात स्थिती चिंताजनक आहे. खेरीज ग्राहकांच्या सवयीदेखील बदलत आहेत. डिजिटल व्यवहार, ई–कॉमर्स, वर्क फ्रॉम होम यासारख्या बाबी अधिक प्रमाणात स्वीकारल्या जात असल्यामुळेही एकंदरच अर्थव्यवस्थेवर परिणाम दिसत आहेत. यातील सगळ्यात मोठा परिणाम ट्रम्प यांच्या आक्रमक आर्थिक धोरणांच्या अनुषंगाने बघायला हवा. कारण त्यांनी राबवण्यास सुरूवात केलेले विविध राष्ट्रांसंदर्भातील प्रशुल्काचे (टॅरिफ) धोरण भीतीमध्ये भर घालत असून जागतिक वातावरण अस्थिर करण्यातील त्याचा वाटा मोठा आहे. परिणामी मंदीची चिंता दाटत आहे. भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांमध्ये तर ही चिंता अधिक गहिरी होताना दिसते. शेअर बाजारात सातत्याने दिसून येणारी घसरण, डॉलरपुढे सातत्याने घसरणाऱ्या रुपयाच्या चढ–उताराची तौलनिक स्थिती, रुपयाच्या गटांगळ्या या सर्व परिस्थितीद्वारे आपण भारतात ही स्थिती अनुभवतच आहोत. त्याचप्रमाणेच अलिकडेच ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडा या दोन देशांकडून आयात होणाऱ्या वस्तूंवरील प्रशुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवरील शुल्कही जवळपास दुपटीने वाढवले आहे. येत्या एक एप्रिलपासून ते आणखी वाढवण्याचे संकेतही मिळत आहेत. वॉरेन बफेट या जगातील सर्वात मोठ्या आणि हुशार गुंतवणूकदाराने अलिकडे केलेले एक विधान या दृष्टीने विचारात घ्यावे लागेल, कारण ट्रम्प यांची सध्याची वर्तणूक आपल्याला जागतिक युद्धाकडे नेणारी आहे, असे त्यांनी केलेले प्रतिपादन धोक्याची दाट छायाच दाखवून जाते. कॅनडा, मेक्सिको आणि चीन या तीनच देशांच्या अमेरिकेशी असणाऱ्या व्यापाराचा विचार करायचा तर तोच जवळपास दोन हजार २० कोटी डॉलरच्या घरात असल्याचे दिसते. म्हणजेच अमेरिकेच्या आक्रमक पवित्र्याचा परिणाम या देशांमधील आर्थिक उलाढालीवर अगदी थेट होणार असल्याचे उघड आहे. भारताचा अमेरिकेशी असणारा व्यापार सुमारे एक हजार ९०० कोटी डॉलर्स इतका आहे. स्वाभाविकच आपल्यावरही त्याचा परिणाम दिसणार आहे. दुसरीकडे, ट्रम्प यांच्या या धोरणामुळे अमेरिकेतील महागाईदेखील वाढत जाणार आहे स्वाभाविकच अशा पद्धतीने महागाई वाढल्यास ती कमी करण्यासाठी यूएस फेडरल रिझर्व्ह सिस्टीमला व्याजदर कमी करावा लागेल. या गोष्टीला अजून वेळ असला तरी ही बाब अटळ वाटते. पण एकदा तिथे व्याजदर कमी झाला की आपल्याकडील व्याजदर अधिक आकर्षक वाटेल आणि गुंतवणूकदार आपल्याकडे आकृष्ट होतील. अलिकडेच अमेरिकेच्या वाणिज्य मंत्र्यांनी तसेच खुद्द ट्रम्प यांनी भारताकडून आकारले जाणारे आयात शुल्क सर्वात जास्त असल्याचे सांगितले. त्यामुळेच भारताबरोबर व्यापार करणे कठीण असल्याचे त्यांचे प्रतिपादन चर्चेत राहिले. इथे लक्षात घ्यायला हवे की, मोठा व्यापारी भागीदार असल्यामुळे अमेरिकेशी असणारा भारताचा व्यापार महत्त्वाचा आहे. मुख्य बाब म्हणजे आयात–निर्यातीतील फरक भारताच्या दृष्टीने फायदेशीर आहे. मात्र अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क वाढवले तर परिस्थिती बदलू शकते. इलेक्ट्रॉनिक्स, दागदागिने, शेती उत्पादने, धान्य, कपडे या सगळ्या क्षेत्रांमध्ये आपण अमेरिकेकडून विविध प्रकारची सामग्री आयात करतो. त्यावरील करशुल्कांमुळे काही बदल घडले तर सर्व क्षेत्रांमध्ये परिणाम बघायला मिळेल. म्हणूनच काही तज्ज्ञांच्या मते, भारताला आपले आयात शुल्क कमी करावे लागले तरी हरकत नाही. दुसरी बाब म्हणजे ट्रम्प यांनी उत्पादनावर आयात शुल्क न आकारता विशिष्ट क्षेत्रासाठी समान आयात शुल्क आकारले जावे, असे मत व्यक्त केले आहे. म्हणजेच धान्याचे क्षेत्र घेतले तर गहू आणि तांदूळ या दोन प्रकारांवर आकारले जाणारे आयात शुल्क वेगळे असू शकते. मात्र ट्रम्प यांच्या मते तांदूळ, गहू, डाळी, तेल या सगळ्यावर एकच शुल्क आकारले जावे. याव्यतिरिक्त याच पद्धतीने इलेक्ट्रॉनिक्समधील लहानापासून मोठ्या वस्तूंवर एकच शुल्क आकारले जावे. आता अमेरिकेची ही मागणी भारत मान्य करतो का, हे पहावे लागेल, कारण दोन उत्पादनांच्या आयात शुल्कामध्ये फरक असतो. अमेरिकेशी संबंध जपण्यासाठी काही प्रमाणात आयात शुल्क कमी करावे लागल्यास होणारे उद्योगांचे नुकसान टाळण्यासाठी केंद्र सरकारला आर्थिक पाठबळ पुरवावे लागेल. तेव्हा लवकरच या धोरणांचा विचारही केला जाईल. दुसरीकडे, बांगलादेशमध्ये अस्थिरता राहिल्यास भारत त्याची जागा घेऊ शकतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तयार कपड्यांमध्ये बांगलादेशचा वाटा १२ टक्के असून आपला वाटा चार टक्के इतका आहे. आपण हा आठ टक्क्यांचा फरक सहज भरुन काढू शकतो. अर्थातच त्यासाठी सरकारने या उद्योगांना साह्य करावे लागेल. म्हणजेच अस्थिरता असली तरी भारत संधींचे सोने करुन परिस्थिती आपल्यासाठी अनुकूल करुन घेऊ शकतो.

## नेप्तीत उद्यापासून कीर्तन महोत्सव




**समाचार/नगर-दि.२५**

नगर तालुक्यातील नेप्ती येथील नंदनवन फार्म येथे जाधव परिवाराकडून बांधण्यात आलेल्या नर्मदेश्वर महादेव मंदिराच्या अकराव्या वर्धापन दिनानिमित्त नर्मदेश्वर मित्र मंडळ, सरस्वती हॉस्पिटल, नंदनवन मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय कीर्तन महोत्सव सोहळ्याचे महाप्रसादाचे व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

संगमनाथ महाराज विशाल गणपती मंदिर अहिल्यानगर व वेदशास्त्र संपन्न बाळकृष्णदेवा पंढरपूरकर व गंगानाथ महाराज गुरुगंडानाथ यांच्या उपस्थित हे कार्यक्रम होणार आहेत .

नर्मदेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त बुधवार दि.२६ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळात हरिपाठ व महाआरती तसेच रात्री ९ ते११ या वेळात ह.भ.प .संजय महाराज महापुरे कामरगाव यांचे कीर्तन होईल. गुरुवार दि. २७ मार्च रोजी सकाळी १० वा. ह .भ .प. गुलाब महाराज खालकर आर्वी ता. जुन्नर यांचे कीर्तन होईल .त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. भाविकांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन नर्मदेश्वर मित्र मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव व माजी सभापती सुवर्णा जाधव यांनी केले आहे.

## वास्तूशास्त्र प्रवेशासाठी आयएमएस येथे अभ्यास वर्ग

**समाचार/नगर-दि.२५**

बॅचलर ऑफ आर्किटेक्चर (वास्तुशास्त्र) प्रवेशासाठी लागणाऱ्या (नाटा) पूर्व परीक्षेला सुरुवात झाली आहे परीक्षेची मुदत ही जून २०२५ पर्यंत आहे. आर्किटेक्चर अभ्यासक्रम प्रवेशासाठी घेतली जाणारी नाटा पूर्व परीक्षा या परीक्षेचे केंद्र नगर मधील रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नगर–सोलापूर रोड, नालंदा स्कूल शेजारी, वाळूंज, अहमदनगर. यांना मान्यता असून या संधीचा सर्व विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा.

पालकांच्या विनंती वरून रमेश फिरोदिया एज्युकेशन ट्रस्टचे रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर नगर–सोलापूर रोड, वाळुंज, अहमदनगरचे विश्वस्त सीए रमेश फिरोदिया, सल्लागार विश्वस्त, डॉ. शरद कोलते यांनी (नाटा) पूर्व परिक्षेचे वर्ग सकाळी १0:00 –१२:३0 या वेळेत आठवड्यातून ३ दिवस नगर येथील खचड कॉलेज येथे होतील असे सांगितले आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी ९५१८३३८२०२, ८६०५०५३०२५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# संत गाडगेबाबा

संत गाडगेबाबा ज्यांनी प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन 'स्वच्छते'चा महामंत्र संपूर्ण देशाला दिला.दया, करुणा, बंधुता, सौहार्द, मानव कल्याण, परोपकार, निराधारांना मदत करणे या गुणांचे भांडार त्यांच्याकडे होते.

त्यांना अस्वछता बघून खूप वाईट वाटे. त्यामुळे कीर्तनाच्या निमित्ताने जिथे जिथे जात तिथे गाडगेबाबा व त्यांचे अनुयायी स्वत: हातात झाडू घेऊन संपूर्ण गाव स्वच्छ करीत आणि मगच कीर्तनाला सुरुवात करीत. ते एक महान तत्त्वज्ञानी, द्रष्टे, समाज सुधारक, प्रबोधनकार होते. गाडगेबाबांनी सहभोजनाच्या माध्यमातून 'जातीय सलोखा' निर्माण करण्याचे फार मोठे काम केले. वाईट चालीरिती परंपरा रूढी बंद कराव्या असं ते नेहमी आवाहन करायचे. शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे म्हणून शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा याकीता विविध शिक्षण संकुले काढली. शिक्षण संस्थांना मदत केली. अंधश्रद्धा निर्मूलन हे अतिशय महत्त्वाचं काम त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये केलं. हुंडा प्रथेवर सुद्धा त्यांनी मोठ्या प्रमाणात कठोर टीका केली. हुंडा प्रथा बंद व्हावी, याकरिता प्रयत्न केले. संत गाडगेबाबा यांचे कार्य पुढीप्रमाणे आहे,सन १९०८ मध्ये पुर्णा नदीवर घाटाचे निर्माण केले.१९२५ मध्ये मुर्तीजापूर येथे गोरक्षण , धर्मशाळा व विद्यालयाचे निर्माण केले.सन १९१७ पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाळेचे निर्माण गाडगेमहाराजांनी केले. मी कुणाचा गुरू नाही व माझा कुणी शिष्य नाही असे म्हणून त्यांनी कुठल्याही संप्रदायाला समर्थन देण्याचे नाकारले.८फेब्रुवारी ,इ.स. १९५२ रोजी 'श्री गाडगेबाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था व धर्मशाळा स्थापन केल्या. ऋणमोचन येथील सदावर्त संत गाडगेबाबांनी सुरू केले. गाडगे महाराजांनी कीर्तनांद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला हे गाडगे महाराजांचे आवडते भजन होते.वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली.



**संतगाथा**

संत गाडगे बाबांचे उपदेश साधे आणि सोपे असत. चोरी करू नये, कर्ज काढू नये, व्यसनांच्या आहारी जाऊ नये, देवा–धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नये, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नये असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला

गाडगे महाराज यांची एक सुंदर प्रबोधनपर कविता आहे:

'काय करून न्हायला रे ?'
'न्हायी जी नवस फेडून राहिलो, म्या म्हन्ल माह पोरग ठीक झालं की कोंबड कापीन !'
'अरे कोंबड कुनाच लेकरू हाय ?'
'देवाचच लेकरू हाय !'
'आन तूह लेकरू ?'
'माह व्ह्य ना जी !'
'आन तू कोनाचा रे ?'
'मी माह्या बापाचा न जी !'
'म्हन्जे शेवटी कोनाचा ?
'देवाचं लेकरू !'
'मंग तूह लेकरू बी देवाचच न ?
'हो जी !'

अरे तूच त म्हनते कोंबड बी देवाचं लेकरू आणि तूह बी देवाचं लेकरू . आणि आताच मला सांगत होतास की कोंबड कापलं की देव प्रसन्न होते तूह पोरग बी देवाचं लेकरू है काप त्याले आणि घे देवाले प्रसन्न करून ! असं म्हटल्यावर लोकांच्या अंगावर शहारे येत असत आणि त्यांना कोंबड कापायची हिम्मत देखील होत नसे.

संत गाडगेबाबांचा म्हणत ,भुकेलेल्यांना अन्न द्या,तहानलेल्यांना पाणी पाजा ,उघड्या नागड्यांना वस्त्र द्या,गरीब मुलामुलींना शिक्षणासाठी मदत करा ,बेघरांना आसरा द्या ,अंध, पंगू रोगी यांना औषधोपचारासाठी मदत करा, बेकारांना रोजगार उपलब्ध करा ,पशु–पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय द्या, दुःखी व निराशांना हिंमत द्या.

१४ नोव्हेंबर १९५६ रोजी संत गाडगे बाबांचे पंढरपूर येथे झालेले किर्तन हेच त्यांचे अखेरचे किर्तन ठरले. २० डिसेंबर १९५६ रोजी पेढी नदीच्या काठावर वलगाव (अमरावती) येथे त्यांचा मृत्यू झाला. गाडगेनगर अमरावती येथे त्यांचे स्मारक आहे.

**- शारदा अनंत होशिंग**
समर्थ सत्संग परिवार
९४२०७४८७१८




### राशीभविष्य

- **मेष** : कार्यसिद्धीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. उत्साहाने रहावं. भावंडांबद्दल चिंता संभवते.
- **वृषभ** : दुर्गुण त्यागावे. शारीरिक तक्रारी वाढतील. वाद टाळावे. अडचणी कमी होतील.
- **मिथुन** : सुखस्वास्थ्य लाभणार असून मनावरील दडपण कमी होणार आहे. रेंगाळलेले प्रश्न सुटतील.
- **कर्क** : आर्थिक समस्या कमी होतील. धडाडी वाढणार आहे. महत्त्वाच्या कामात अधिक लक्ष घालावे.
- **सिंह** : देणेकऱ्यांना चुकवू नका. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. शिक्षणात समस्या संभवतात.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात संघर्ष करावा लागेल. ठाम विचाराने रहावं. स्थावर प्रश्न वाढवू नका. प्रवास टाळा.
- **तूळ** : जुनी येणी वसुल होतील. व्यर्थ चिंता करु नका. घाईने घेतलेले निर्णय नुकसानीचे ठरतील.
- **वृश्चिक** : हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. कोणास जामीन राहू नका. विचाराने गुंतवणूक करा.
- **धनु** : नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. घरात शुभकार्य घडतील. अपेक्षित कामं पूर्ण होतील.
- **मकर** : देण्याघेण्याच्या व्यवहारात लक्ष घालावे. कलागुणांचा विकास होईल. सुसंधी लाभतील.
- **कुंभ** : प्राप्तीचं प्रमाण साधारण राहील. अनावश्यक खर्च टाळावा. संततीशी मतभेद संभवतात.
- **मीन** : जबाबदाऱ्यांची विभागणी करावी. ताण फार वाढवू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

सल्ला मोलाचा

### केस धुताना काळजी घ्या

केसांचं आरोग्य उत्तम राहावं यासाठीच्या टीप्स.

– आपले केस कोरडे, तेलकट आणि मिश्र यांपैकी कोणत्या प्रकारचे आहेत ते पाहून योग्य शांपूची निवड करा. – दर दिवसाआड केस रात्री तेलानं मालिश करून दुसऱ्या दिवशी शांपूने स्वच्छ धुवून टाका. केस धुण्याआधी दीड तास कोमट तेलानं मसाज केला तरी पुरेसं ठरतं. – केस गळू नयेत यासाठी शांपू लावण्याआधी केस चांगले ओले करून घ्या. शांपू लावल्यावर अर्ध्या मिनिटानं केस धुवून टाका. – केस धुण्यासाठी कोमट किंवा शक्य असेल तर थंड पाण्याचा वापर करा. – चमक यावी म्हणून चहाच्या पाण्यानंही केस धुवू शकता. – केसांना शांपू केल्यानंतर कंडिशनरचाही वापर करा. – केस वाळवण्यासाठी हेअर ड्रायरचा वापर करू नका. जर लवकर केस कोरडे करायचे असतील तर केसांभोवती पंचा गुंडाळून ठेवा. पंचाने केस जोरात पुसू नका. – पंख्याखाली वाळवून केस कोरडे करू नका.

### २६ मार्च

दिनविशेष

**१९९७** : ज्येष्ठ गांधीवादी आणि उद्योगपती नवकमल फिरोदिया यांचा मृत्यू.
**२०१५** : विश्वकरंडक स्पर्धेमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियाकडून पराभव.
**२०१६** : 'स्टिंग ऑपरेशन'मुळे उत्तराखंडचे मुख्यमंत्री हरीश रावत अडचणीत.
**२०१७** : राजकीय पक्षांसाठी 'नो ड्यूज' चा प्रस्ताव.
**२०१८** : अमेरिकेने सात पाकिस्तानी कंपन्यांना आपल्या देशात व्यवसाय करण्यास बंदी घातली.

जाणून घ्या

### औषधांविषयी

चला, औषधांच्या जगात एक फेरफटका मारू या. औषधांचे प्रकार आणि रंग वेगवेगळे असतात. एखादी गोळी निळ्या रंगाची असते तर एखादी पिवळ्या रंगाची असते. या गोळ्यांमुळे तुम्हाला बरं वाटतं. बरीचशी औषधं प्रयोगशाळांमध्ये तयार केलेली असतात. बऱ्याच औषधांमध्ये नैसर्गिक घटकांचा वापर केलेला असतो. निर्मिती केल्यानंतर औषधाची चाचणी केली जाते. या चाचण्या एक किंवा जास्त वेळाही केल्या जातात. काही चाचण्या माणसांवर तर काही प्राण्यांवर केल्या जातात. या चाचण्यांमधून वेगवेगळे निष्कर्ष काढले जातात. माणसांच्या वापराच्या दृष्टीने सुरक्षित असल्याचं सिद्ध झाल्यानंतरच ती औषधं पुढे पाठवली जातात. नवी औषधं हा जुन्याच औषधांचा पुढचा टप्पा असतो. लोकांना लवकरात लवकर बरं वाटण्याच्या दृष्टीने त्यात बदल केलेले असतात. आजारपण दूर करण्यासाठी लोक औषधं घेतात. तर अनेकदा प्रतिबंध म्हणूनही औषधं घेतली जातात. औषधांचे विविध प्रकार आहेत. प्रतिजैविकं हा प्रकार चांगलाच प्रचलित आहे. बऱ्याच मुलांना प्रतिजैविकं दिली जातात. ही प्रतिजैविकं विविध प्रकारच्या बॅक्टेरियांशी लढू शकतात.

आरोग्यमंत्र

### म्हणून हृदय जपा

हृदय हा सतत कार्यरत राहणारा महत्त्वपूर्ण अवयव आहे. हृदय दररोज ७,००० लीटर रक्त पंप करतं (यापैकी ७०% रक्त मेंदुसाठी लागतं आणि उर्वरित शरीराला ३०% रक्त मिळतं). हे रक्त ७०,००० किमी पेक्षाही लांब रक्तवाहिन्यांमधे प्रवाहित होत असतं. एक टन वजन ४२ फूट उंचीपर्यंत उचलण्यासाठी आवश्यक असते तितकी शक्ती हृदय त्याच्या कार्यातून दररोज निर्माण करत असतं.



आपण थकल्यावर आराम करतो पण हृदयानं अवघी ४ ते ५ मिनीटं आराम केला तरी आपला कायमचा आराम मिळू शकतो. अशाप्रकारे हृदय सतत कार्य करू शकते कारण ते अनुशासनाच्या आधारावर काम करतं. सामान्य परिस्थितीमधे हृदय ०.३ सेकंद आकुंचन पावतं तर ०.५ सेकंद प्रसरण पावतं. या हिशोबाने ०.३ + ०.५ = ०.८ सेकंदात हृदयाचा एक ठोका पूर्ण होतो म्हणजे एका मिनीटात ७२ ठोके होतात जे सामान्य असतात. आरामाच्या ०.५ सेकंदात अशुध्द रक्त फुफ्फुसात जाऊन १००% शुद्ध होऊन येतं. असं असताना काही कारणानं शरीराला कमी वेळात जास्त रक्तपुरवठ्याची गरज निर्माण झाली तर हृदय जास्त रक्त पंप करण्यासाठी आरामाची वेळ कमी करतं. अश्या परिस्थितीत आराम ०.४ सेकंद झाला तर हृदयाचा एक ठोका ०.७ सेकंदात पूर्ण होऊन दर मिनीटाला ही संख्या ८२ च्या वर जाते आणि केवळ ८०% च रक्त शुध्द होतं. हे वारंवार झालं तर शरीरावर त्याचे परिणाम दिसून येतात.

पंचांग

**बुधवार, २६ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. १२, नक्षत्र: धनिष्ठा
चंद्रराशी : मकर, योग : सिद्ध,
सूर्योदय: ६.४०, सूर्यास्त: ६.४९

फॉरवर्डस

**पहिलं प्रेम हे नेहमी पहिलं प्रेमच असतं...**

यकीन कर तेरे बाद हस हस के,
ठुकराए हैं मैने इश्क के कई मौके

वाचा तर खरं

✻ गुलमर्ग– गुलमर्गचा अर्थ फुलांचा मार्ग. साठच्या दशकात गुलमर्गला बॉलीवूडची ओळख मिळाली. जम्मू काश्मीरच्या रमणीय प्रदेशात स्थित असलेलं गुलमर्ग विंटर स्पोर्टसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी बॉबी, जब तक है जान, हैदर, ये जवानी है दिवानी अशा अनेक चित्रपटांचं चित्रिकरण झालं.

✻ मुन्नार– केरळमधील चहाच्या सुंदर मळ्यांची चित्रपट दिग्दर्शकांना भूरळ पडली नाही तर नवलच! केरळमधील मुन्नार इथं चेन्नई एक्सप्रेस, निशब्द, लाईफ ऑफ पाय, गुप्त या चित्रपटांचं चित्रकरण झालं आहे. मुन्नारला येण्याची योग्यवेळ ऑक्टोंबर ते मे आहे.

करिअरवाटा

### व्हा व्यापारतज्ज्ञ

जग एक खेडं बनलेलं असताना, जगभर आस्थापनांच्या शाखा विकसित होत असताना त्यांचे व्यवहार हाताळण्यासाठी व्यावसायिक व्यवहारांची जाण असणाऱ्या कुशल कर्मचाऱ्यांची गरज असते. त्यामुळेच इंटरनॅशनल बिझनेस या विषयात एमबीए करुन तुम्ही नानाविध संधी मिळवू शकता. ✻ इंटरनॅशनल बिझनेसच्या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय व्यवसायासंबंधीची विविध कौशल्यं शिकवली जातात. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर परदेशात व्यवसाय वाढवण्यासाठी गरजेचं ठरणारं सगळं ज्ञान मिळू शकतं. ✻ इंटरनॅशनल बिझनेस या विषयात एमबीए केल्यानंतर विमान वाहतूक कंपन्या आणि रेस्तराँमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. यासोबत सरकारी कंपन्या आणि एनजीओही या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना संधी देतात. देशी–विदेशी बँका, पर्यटन कंपन्या, हॉस्पिटॅलिटी आदी क्षेत्रांमध्ये चांगली पॅकेजेस मिळू शकतात. ✻ या क्षेत्रात तगडं पॅकेज मिळू शकतं. ✻ इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड, जेके बिझनेस स्कूल, एशियन स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, सिंबायोसिस इन्स्टीट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट यासारख्या संस्थांमध्ये तुम्ही इंटरनॅशनल बिझनेसचे धडे घेऊ शकता.



खेचाखेची

### काय करावं?

**शिक्षक** : बंड्या मला सांग, रात्री डास चावले तर काय करायला पाहिजे?

.
.
.
.
.
.

**बंड्या** : काही नाही. खाजवून गप्प झोपायला पाहिजे. तुम्ही काय रजनीकांत नाही की त्याच्याकडून सॉरी म्हणवून घेऊ शकाल...!

वेगळं काही

फ्रान्स आणि स्पेन या देशांच्या मध्ये असलेलं फँसेस हे बेट सहा महिने फ्रान्सकडे तर सहा महिने स्पेनकडे असतं. हे बेट ३०० चौरस मीटर परिसरात पसरलं आहे. फ्रान्स आणि स्पेनला वेगळं करणाऱ्या बिदाओसा नदीवर हे बेट वसलं आहे. फँसेस हे मानवनिर्मित बेट असून तिथे कोणीही रहात नाही. या बेटाला न्यूट्रल टेरीटरी असं म्हटलं जातं. १६५९ मध्ये फ्रान्स आणि स्पेन यांच्यात याच बेटावर युद्धबंदीबाबत चर्चा झाली होती. या दरम्यान शांतता करार करण्यात आला. यावेळी फ्रान्सच्या चौदाव्या किंग लुईसने स्पेनच्या चौथ्या किंग फिलिपच्या मुलीशी लग्न केलं. दोन्ही देशांच्या मध्ये असलेलं हे बेट वाटून घेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

हेअर केअर

### चलती ब्लॅकबेरी शेडची

एकीकाळी काळेभोर केस हे सौंदर्याचं लक्षण मानलं जात असे. आता मात्र केसांवर विविध रंगाचे कलर्स लावले जातात. या छटा केसांचं सौंदर्य खुलवतात त्याचप्रमाणे पांढरे केसही लपवतात. अर्थात हे रंग आकर्षित करणारे असले तरी ते वापरताना बरीच काळजी घ्यावी लागते. मात्र फारशी काळजी घेण्याची गरज नसणारेही काही रंग आहेत. त्यात ब्लॅकबेरी शेडचा समावेश होतो. सध्या ब्लॅकबेरी हेअर कलरची चलती आहे. या रंगाची फारशी देखभाल करावी लागत नाही. त्याचा बेस तयार करण्यासाठी घातक रसायनांची गरज लागत नाही. ब्लीचिंगसाठी केसांच्या मुळांपर्यंत जावं लागत नाही. त्वचेच्या रंगानुसार यातील योग्य शेडची निवड केली जाते. बरेच हेअर स्टायलिस्ट हा रंग कस्टमाइज करून देतात. ब्लॅकबेरी आणि ब्लू या रंगसंगतीमुळे वेगळा लूक मिळतो. हा रंग प्रभाव पाडतो. केस पूर्णपणे हायलाईट करण्यापेक्षा बटांना हा रंग दिला असता खुलून दिसतो. नैसर्गिक काळ्या केसांऐवजी ब्लॅकबेरी बेस्ट ठरतो. त्यामुळे केस रंगवायच्या विचारात असाल तर ब्लॅकबेरीची निवड करा. हा रंग तुमच्या व्यक्तिमत्त्वाची शान अनेक पटींनी वाढवेल याची खात्री बाळगा.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा–अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# अर्ज़ किया है...

*यहाँ लिबास की क़ीमत है आदमी की नहीं*
*मुझे गिलास बड़े दे शराब कम कर दे*
- बशीर बद्र

**लिबास- पोशाख, वस्त्र**

आजकालचा जमाना हा दिखाव्याचा झाला आहे. अनेकजण स्वत:च्या कौशल्यापेक्षा दिखाव्याला जास्त प्राधान्य देतात. अनेकदा वस्तू विकत घेतानासुध्दा तिच्या बाह्य सौंदर्यावर जास्त भर दिला जातो, मग आतून ती कितीही साधारण दर्जाची असली तरी चालते. त्यामुळे शायर म्हणतात की, ते माणसापेक्षा पोशाखाला किंमत जास्त आहे. पोशाखावरुन माणसाची किंमत ठरविली जाते. याचाच संदर्भ देत ते म्हणतात की, मला पेला मोठा द्या, आतमध्ये मद्य कमी असले तरी चालेल, कारण लोक दिखाव्यावरुन माझी किंमत करणार आहेत.


# समाचार

मंगळवार, दि. २५ मार्च २०२५ पान ३


# महावीर युवक मंडळातर्फे २८ रोजी महाभोजन कार्यक्रम



**समाचार/नगर-दि.२५**

भारतीय संस्कृतीत भुकेलेल्यांना अन्न देणे आणि भगवंताच्या नामाचे स्मरण करणे या दोन गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. मानवसेवेलाच ईश्वरसेवा मानून सर्वांना संस्कारांची शिदोरी देणाऱ्या राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने सालाबादप्रमाणे यंदाही दि.२८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत अन्नदान (महाभोजन) कार्यक्रम आयोजित केला आहे, अशी माहिती मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा यांनी दिली. आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या शिकवणुकीप्रमाणे कार्य करणाऱ्या जय आनंद महावीर युवक मंडळाने ३० वर्षांपूर्वी आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी अन्नदानाचा उपक्रम सुरु केला. दरवर्षी अनेकांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविला जातो.

जय आनंद मंडळाच्या या महाभोजनाचा दरवर्षी हजारोंच्या संख्येने भाविक लाभ घेतात. गेल्या ३० वर्षांपासून सुरू असलेल्या या भोजन सेवेचा लाभ आतापर्यंत लाखो भाविकांनी घेतलेला आहे. आचार्य आनंदऋषीजी महाराजांचा हा प्रसाद आहे, अशी श्रध्दा भाविकांमधून मंडळाचे कार्यकर्ते ऐकतात तेव्हा भारावून जातात. मंडळातर्फे वंचित मुलांच्या विविध संस्थांनाही प्राधान्याने भोजन पोहोच केले जाते. या कार्यक्रमासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तब्बल महिनाभर परिश्रम घेतात. शुक्रवारी दि.२८ मार्च २०२५ ला नवीपेठमध्ये आयोजित केलेल्या या महाभोजनाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे करण्यात आले आहे.


**समाचार वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## विरोधकांनी सर्व जागा जिंकल्या; सत्ताधारी मंडळाचे पानिपत

# माध्यमिक शिक्षक सोसायटीत २५ वर्षानंतर सत्तांतर



**समाचार/नगर-दि.२५**

जिल्ह्यातील शिक्षण संस्थाचालकांसह शैक्षणिक वर्तुळाचे विशेष लक्ष असलेल्या जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या निवडणुकीत २५ वर्षानंतर सत्तांतर झाले. प्रा. भाऊसाहेब कचरे यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी पुरोगामी सहकार मंडळाचे पूर्ण पानिपत झाले. विरोधी स्वाभिमानी, परिवर्तन मंडळाने २१ पैकी २१ जागा जिंकत कचरेप्रणित मंडळाला आसमान दाखवले. जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचारी सभासद असलेल्या या संस्थेच्या निवडणुकीची रणधुमाळी ऐन १० वी - १२ वी परीक्षेच्या कालावधीत निर्माण झाली होती. रविवारी झालेल्या मतदानात ९१५२ मतदारांपैकी ९४.३५ टक्के मतदान झाले. जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. आज सोमवारी मतमोजणी झाली. दुपारीच निवडणुकीचा कौल स्पष्ट झाला आणि स्वाभिमानी परिवर्तन मंडळाने गुलाल उधळत जल्लोष केला.

सेवानिवृत्त झालेले सत्ताधारी मंडळाचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब कचरे यांची गेल्या २५ वर्षांपासून संस्थेचा एकहाती सत्ता होती. यंदा त्यांच्या विरोधात विविध शिक्षक संघटनांनी एकजूट निर्माण केली.

सत्ताधारी मंडळातील माजी संचालकही उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज होते. ते विरोधकांनी जाऊन मिळाले. कचरे यांनी एक अपवाद वगळता सर्वच नवीन चेहरे निवडणुकीत उतरवले होते. मात्र त्यांचा आत्मविश्वासफोल ठरला. सभासदांनी त्यांना सोसायटीच्या राजकारणातून सेवानिवृत्त केले. दत्ता नारळे, राजेंद्र लांडे, सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे हे पारंपरिक कचरे विरोधक शिक्षक नेते यापूर्वी स्वतंत्र लढत होते. ते यंदा एकत्र आले. इतरही संघटनांना बरोबर घेतले. स्वाभिमानी परिवर्तन मंडळाने संस्थेतील गैरकारभाराविरुध्द मोठे रान उभे केले होते. माध्यमिक शिक्षक सभासदांनी पूर्ण परिवर्तन घडवून पुरोगामी सहकारी मंडळाचा धुव्वा उडवला. स्वाभिमानी परिवर्तन मंडळाने सत्ताधाऱ्यांचा ५०० हून अधिक मतांनी पराभव केला. सर्वाधिक मते अप्पासाहेब शिंदे यांना मिळाली. त्या खालोखाल बाबासाहेब बोडखे यांनी मते मिळवली.

**सर्वांना विश्वासात घेवून आम्ही निवडणूक लढलो. सभासदांनी आमच्यवर विश्वास टाकला. हा सर्वांच्या ऐक्याचा ऐतिहासिक विजय आहे. यापुढेही सभासद हित डोळ्यासमोर ठेवून कारभार केला जाईल.**

**- प्रा. सुनील पंडित**
(नेते स्वाभिमानी परिवर्तन मंडळ)

### 'त्या' ७ माजी संचालकांमुळे विजयश्री

**कल्याण ठोंबरे, सुरेश मिसाळ यांच्यासह ७ माजी संचालकांनी सत्ताधाऱ्यांची साथ सोडत विरोधी परिवर्तन मंडळाच्या प्रचाराची धुरा सांभाळली. या ७ माजी संचालकांमुळे विरोधी परिवर्तन मंडळाला विजयश्री खेचता आला. सत्ताधाऱ्यांच्या कार्यपध्दतीमुळे जुन्या निष्ठावान संचालकांमध्ये नाराजी वाढली होती. त्यामुळे त्यांनी सत्ताधाऱ्यांची साथ सोडली.**

विजयी उमेदवार व त्यांना मिळालेली मते -

सर्वसाधारण - बाजीराव अनभुले ४३००, राजेंद्र कोतकर - ४६३६, अतुल कोताडे - ४२७५, सुधीर कानवडे - ४६२९, संभाजी गाडे - ४६२६, बाळाजी गायकवाड-४४९०, उमेश गुंजाळ- ४६३८, अप्पासाहेब जगताप - ४५०५, सुनील दानवे - ४७२७, किशोर धुमाळ - ४५६२, विजय पठारे - ४२४८, छबु फुंदे - ४३८९, साहेबराव रक्टे - ४३५२, शिवाजी लवांडे - ४३११, आप्पासाहेब शिंदे - ५२३०, महेंद्र हिंगे - ४६३७, महिला राखीव - वर्षा खिलारी - ४८९२, वैशाली दारकुंडे - ४८२३, अनुसुचित जाती - सुरज घाटविसावे- ४६२४ इतर मागासप्रवर्ग - अर्जुन वाळके - ४६३८, भटके विमुक्त - बाबासाहेब बोडखे - ५१२०.

# भाजपाच्या प्रभाग ११ बुथच्या प्रमुखपदी वर्मा



**समाचार/नगर-दि.२५**

येथील भाजपा शहर जिल्हा सचिव गोपाल मुरलीधर सहदेव(वर्मा) यांना प्रभाग ११ मधे बुथ क्रमांक २२७ चे बुथ प्रमुख या पदावर सुचक आशिष अनेचा यांनी सुचवले व निरीक्षक नगरसेवक अजय चितळे यांनी त्याची निवड करून सत्कार केला

प्रभाग ११ बुथ क्रमांक २२७ डावरेगल्ली,हातमपुरा परिसराची बुथ रचना करण्यात आली असून आज प्रभाग ११ चे प्रभारी निरीक्षक नगरसेवक अजय चितळे यांच्या अध्यक्षते खाली बुथ बैठक पार पडली.यामध्ये बुथ रचना पुढील प्रमाणे निवड करण्यात आली. बुथ प्रमुख- गोपाल मुरलीधर सहदेव (वर्मा),सरचिटणीस; आशिष अनेचा, लाभार्थी प्रमुख; शाम भागचंद वर्मा,मनकी बात प्रमुख; विशाल विजय तोडकर,व्हाट्सएप्प ग्रुप प्रमुख;अमित सोनग्रा,बीएलए२ ;अमोल हजारे,सदस्य; शोभा आरवीकर, विशाल गणेश होनराव, अजयसिंह परदेशी,नितु सहदेव,वैशाली परदेशी व आदीनाथ तोडकर,

अजय चितळे यांनी माहिती दिली.सर्व पदाधिकारी व सदस्यांना आपली जवाबदारी कशी कार्यान्वित करावी याची रुपरेखा व्यवस्थित सांगुन मार्गदर्शन केले,सर्व बुथ कमीटीने चांगले काम करण्याचे आश्वासन अजय चितळे यांना दिले.

## बोरा, सूर्यवंशी, प्रा. जोशी, आ. जगताप, आयुक्त डांगे, आहेर व भुतारे मानकरी

# रसिक ग्रुपच्या पुरस्कारांची घोषणा; रविवारी वितरण



सौरभ बोरा | महेश सूर्यवंशी | प्रा.मिलिंद जोशी | आ.संग्राम जगताप | यशवंत डांगे | दिनेश आहेर | गणेश भूतारे

**समाचार/नगर-दि.२५**

सामाजिक व सांस्कृतिकसह विविध क्षेत्रात समाजाभिमुख कार्याद्वारे महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तीमत्वांना तसेच अहिल्यानगरच्या जडणघडणीत, विकासात मोलाची भर घालत नावलौकिक वाढवण्यासाठी भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींना रसिक ग्रुपच्या वतीने दरवर्षी 'रसिक गौरव पुरस्कार' देवून सन्मानित करण्यात येते. गेल्या २२ वर्षांपासून अखंडितपणे या पुरस्कारांचे समारंभापूर्वक वितरण केले जाते. यावर्षी तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती देवस्थानचे खजिनदार महेश सूर्यवंशी, प्रसिद्ध व्याख्याते व मसापचे कार्याध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी, अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर व गणेश भूतारे यांना रसिक ग्रुपच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कारांचे वितरण रविवार दि.३० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता गुढीपाडव्या निमित्त होणाऱ्या 'रसिकोत्सव' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमात होणार आहे, अशी माहिती रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर यांनी दिली.

यावर्षीचा स्व.शांतीकुमार फिरोदिया स्मृती रसिक गौरव हा राज्यस्तरीय पुरस्कार नगरचे सुपुत्र व जगातील सर्वात मोठ्या व श्रीमंत देवस्थान तिरुमला तिरुपती बालाजी मंदिरचे सलग तीनवेळा विश्वस्तपद भूषवणारे सौरभ बोरा यांनी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल जाहीर झाला आहे. तसेच पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती देवस्थानचे खजिनदार महेश सूर्यवंशी यांना धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल स्व.प्रदीप गांधी स्मृती रसिक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष व प्रसिद्ध व्याख्याते प्रा.मिलिंद जोशी यांचा साहित्य चळवळ वृध्दिंगत करत या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना रसिक गौरव पुरस्काराने सन्मानित करणात येत आहे.

रसिक ग्रुपच्या वतीने रविवार दि.३० मार्च रोजी गुढीपाडव्यानिमित्त सावेडीच्या जॉगिंग पार्क मैदानावर सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या 'रसिकोत्सव' या राज्यातील सर्वात मोठ्या गुढी पाडवा संगीतिक सांस्कृतिक कार्यक्रमात मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते या सर्व मानाच्या पुरस्कारांचे वितरण होणार आहे, अशी माहिती दिपाली देऊतकर यांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळ्याची अधिक माहिती देताना सुदर्शन कुलकर्णी म्हणाले,की ग्रुपच्या वतीने देण्यात येणारा स्व. शांतीकुमार फिरोदिया स्मृति रसिक गौरव राज्यस्तरीय पुरस्कार तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांना प्रदान करण्यात येणार आहे. बलाजींचे नीत्सिम भक्त असलेले सौरभ बोरा हे गेल्या अनेक वर्षांपासून तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त आहेत. याचा सार्थ अभिमान नगरकरांना आहे. आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती देवस्थानचे खजिनदार महेश सूर्यवंशी हे देवस्थानच्या माध्यमातून पुण्यासह इतर राज्याच्या इतर भागातही मोठ्याप्रमाणात समाजसेवेचे उपक्रम राबवून ईश्वर सेवा व मानव सेवेची सांगड घालत आहेत. त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे. आमदारकीची सलग हॅटट्रिक करणारे आ.संग्राम जगताप यांनी राज्य सरकार कडून अहिल्यानगरच्या विकासासाठी भरगोस निधी मंजूर करून शहराच्या विकासाचा वेग वाढवला आहे. त्यामुळे नागरिकांना भेडसावणारे प्रश्न मार्गी लागल्याने शहराची वाटचाल विकसित शहराच्या दिशेने होत आहे. त्यांच्या या कार्याचा विशेष गौरव रसिक ग्रुप करणार आहे. महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रशासक या पदाला शोभेल असे उत्कृष्ट काम करत शहराच्या विकासासाठी धडाडीने महत्वाचे निर्णय घेत अनेक प्रश्न सोडवले आहेत. तसेच शहरातील सांस्कृतिक चळवळीला पाठबळ देत अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सावेडीच्या नाट्य संकुलच्या कामास मोठी चालना दिली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरवही या सोहळ्यात होणार आहे. या पुरस्कार वितरण समारंभांचे नियोजन रसिक ग्रुपचे तेजा पाठक, निखिल डफळ, समीर पाठक, प्रशांत अंतापेलू, श्रीकृष्ण बारटक्के, स्नेहल उपाध्ये, प्रसन्न एखे, बाळकृष्ण गोटीपामुल, तुषार बुगे, मीनाक्षी पाटील, शारदा होशिंग, ऋषिकेश येलुलकर, ओंकार अंतापेलु आदी करीत आहेत.

# मुंबई शेअर भाव

डोनाल्ट ट्रम्पची टेरिफ पॉलिसी शिथिलता
**सेन्सेक्स-निफ्टीमध्ये घोडदौड जारी**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २५-०१-२०२५**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७८११० |
| एसीसी | १९४३-४४ |
| एशियन पेंट | २३२६-२७ |
| बजाज ऑटो लि. | ८०५५-५६ |
| बलराम फूड चिनी | ५२७-२८ |
| भारत फोर्ज | ११७८-७९ |
| क्रॉम्प्टन | ३५९-६० |
| डीएलएफ | ६९५-९६ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ११७६-७७ |
| ग्रॅफाईट इंडिया | ५२८-२९ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२७९-८० |
| आयटीसी लि. | ४११-१२ |
| एल ॲण्ड टी लि. | ३४५४-५५ |
| रिलायन्स इंड. | १२८९-९० |
| एसबीआय | ५७६-७७ |
| टाटा मोटर्स | ७११-१२ |
| टाटा स्टील | १५६-५७ |
| टीसीएस | ३६८०-८१ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | १७९-८० |
| सुवेन फार्मा | ११३९-४० |

# मतिमंद व गतिमंद मुलांसाठी होमिओपॅथी उपचार शिबीर

**समाचार/नगर-दि.२५**

राष्ट्रसंत आचार्य प. पु. आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३३ व्या पुण्यस्मरणार्थ निमित्त, दीन दुबळ्याची सेवा हीच खरी ईश्वर सेवा या आचार्य श्री च्या शिकवणी नुसार डॉ. प्रतिमा बोरा यांच्या डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक तर्फे मतीमंद व गतीमंद मुलाच्या जीवनात आशेची नवी पालवी फुलवायची आहे. मतिमंद व गतिमंद मुलांसाठी प्रभावी होमिओपॅथी उपचार शिबीर घेत आहोत.


DR. BORA™
HOMEOPATHY CLINIC
प्रभावी होमिओपॅथीक उपचार


काही कारणांनी इतर सर्वसामान्य मुलांपेक्षा वेगळी असलेली मतिमंद, गतिमंद मुले ही आपल्यातीलच एक असतात. त्यांनाही त्यांच्या जीवनाचा निखळ आनंद मिळवता येवू शकतो. या मुलांना आधाराबरोबरच चांगल्या उपचारांची आवश्यकता असते हे लक्षात घेवून अहिल्यानगरमधील डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिकच्यावतीने खास मतिमंद व गतिमंद मुलांसाठी होमिओपॅथी उपचार व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार २८ मार्च ते शनिवार २९ मार्च २०२५ दरम्यान सकाळी ११ ते रात्री ७ यावेळेत डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिकमध्ये शिबीर होणार असल्याची माहिती डॉ. प्रतिमा बोरा यांनी दिली.डॉ. प्रतिमा बोरा यांनी सांगितले की, जगभरात एक विश्वसनीय उपचार पध्दती म्हणून होमिओपॅथी उपचार पध्दतीकडे पाहिले जाते. अनेक दुर्धर आजारांवर परिणामकारक व यशस्वी उपचार करण्याची क्षमता या पध्दतीत आहे.

मतिमंद, गतिमंद, सेरेब्रल पल्सी (Cerebral Palsy), कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार (Rare Syndromes) झटके येणे (Epilepsy), लहान मुलांमध्ये योग्य वयात हालचाल न होणे, हातापायांचे स्नायू आखडणे, बाळ योग्य वयात पालथे न पडणे, बसणे, उठणे, चालणे या क्रियांमध्ये त्रास होणे किंवा या क्रिया करता न येणे, बोलता न येणे, मानसिक अल्पविकास, अतिचंचलपणा, इतरांना त्रास देणे, स्वमग्रता, फिटस् येणे, आकलन क्षमता कमी असणे अशा लक्षणांचे प्रमाण वाढत आहे. ज्या रुग्णांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी ९८२२६४६५८८ या मोबाईल नं संपर्क करून नाव नोंदणी करावी. कृपया नोंद घ्यावी की नाव नोंदणी बंधनकारक आहे. डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक, नक्षत्र मेडिकल मागे, चाणक्य चौक, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष भेट द्यावी असे आवाहन डॉ. बोरा यांनी केले आहे.

## भ. महावीर व्याख्यानमाला २०२५

**वार** - मंगळवार, दि. २५ मार्च सायं.७ वा.
**वक्ता** - श्री. अतुल शहा (मुंबई)
**विषय**- आहार आणि आरोग्य
**स्थळ** - आनंदधाम, अहिल्यानगर



## हनुमान चालिसा



**मंगल भक्त सेवा मंडळ**
मंगळवार, दि. २५/०३/२०२५
क्रांतीवीर प्रतिष्ठान ट्रस्ट
प्रोफेसर चौक, सावेडी

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**
मंगळवार, दि. २५/०३/२०२५
समझोता तरुण मंडळ, अभिषेक लॉज, कानडेगल्ली

**दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ**
मंगळवार, दि. २५/०३/२०२५
शशीकांत गाडे
यशांजली बंगला, गोविंदपुरा

केडगाव, अहमदनगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
शिवम प्रॉपर्टीज
SHIVAM PROPERTIES
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57
समाचार
SAMACHAR

गुलाबजामुन, पेढे (फिके कंदी), बासुंदी, जिलेबी, मलाई बर्फी, बुंदी लाडू, समोसा, ढोकळा, कचोरी
महाराष्ट्रसह जिल्ह्यातील प्रसिद्ध मिठाई श्रेणीतील एक अग्रगण्य नाव
१०३ वर्ष
बन्सी महाराज मिठाईवाले
रामचंद्र खुंट, अहमदनगर.
Mo. 9860566509

Volume - 73 | Issue- 183 | Marathi Daily | Tuesday 25/3/2025 | Pages - 4+4 | Price- Rs. 3

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



'ठिय्या मांडून बसलेल्या परप्रांतियांच्या निषेधाच्या' बातम्या नेमके माझे आई-बाबा आपल्याकडे राहायला आल्यावरच कसे हो तुम्ही मोठ्याने वाचत असता?

## मुख्यमंत्रीपद देण्याची तयारी होती ; फडणवीसांचा गौप्यस्फोट

# २०१४ मध्ये उद्धव ठाकरेंच्या भूमिकेने युती तुटली !

**समाचार/मुंबई-दि.२५**

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा – शिवसेना युतीत आम्ही शिवसेनेला १४७ जागा आणि राज्याचे मुख्यमंत्रीपद देण्याची तयारी ठेवली होती, मात्र शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे युतीत १५१ जागांवर ठाम राहिले, त्यामुळे त्या निवडणुकीत भाजपा – शिवसेना युती तुटली, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. भाजपाने विश्वासाच्या बळावर त्या निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकल्या आणि विधात्याच्या मनात असल्याने मी मुख्यमंत्री झालो, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

राजस्थान ग्लोबल फोरमच्यावतीने मुंबईत सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथूर यांच्या सत्कार सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.



या कार्यक्रमास राज्याचे सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार, माजी खा. विजय दर्डा, फोरमचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा – शिवसेना युती का तुटली, यावर भाष्य केले. २०१४ च्या निवडणुकीत आम्ही शिवसेनेला १४७ जागा आणि राज्याचे मुख्यमंत्रीपद देण्याची तयारी ठेवली होती. मात्र शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी युतीत १५१ पेक्षा कमी जागा घेणार नाही, अशी ठाम भूमिका घेतल्याने त्या निवडणुकीत आमची युती तुटली. २०१४ च्या निवडणुकीत मी भाजपाचा प्रदेशाध्यक्ष आणि ओमप्रकाश माथूर राज्याचे प्रभारी होते. शिवसेना १५१ जागांवर ठाम राहिल्याने निवडणुकीत शिवसेनेला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि राज्याचे प्रभारी ओमप्रकाश माथूर यांनी घेतला. त्या निर्णयानंतर भाजपा श्रेष्ठींनी राज्यात कार्यकर्त्यांना बळ दिल्याने निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक जागा मिळाल्या. विधात्याच्या मनात असल्याने मी मुख्यमंत्री झालो, असेही फडणवीस म्हणाले. सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथूर म्हणजे निवडणूक जिंकण्याचे तंत्र असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना काढले. भाजपा श्रेष्ठींनी त्यांच्यावर ज्या ज्या राज्यांची जबाबदारी दिली, तेथे पक्षाला विजयच मिळाला. मग ते महाराष्ट्र असो की नुकतीच निवडणूक झालेले छत्तीसगड असो. संघाचे प्रचारक ते सिक्कीमचे राज्यपाल असा माथूर यांचा प्रवास थक्क करणारा असून माथूर हे राजकारणातच नाही तर समाजकारणातही ऑलराऊंडर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री फडणवीस यांची शायरी...

विधीमंडळाच्या अर्थसंकल्यीय अधिवेशनात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व विरोधकांमध्ये बराच वेळ शाब्दिक संघर्ष चालू होता. यावेळी मुख्यमंत्र्यांनी विरोधकांच्या अनेक प्रश्नांना उत्तरं दिली. तसेच राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, महिला सुरक्षेच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मांडलेल्या मुद्यांवर उत्तरं देताना फडणवीस यांनी शायरीतून उत्तर दिलं. फडणवीस म्हणाले, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई केली जाईल. मात्र, त्यांच्याबद्दल कोणाच्याही मनात संवेदना तयार होत असतील तर ते योग्य नाही. त्यासाठी काही लोकांची मनं तपासून पाहावी लागतील. यावेळी ते म्हणाले आप इतना भी गरज गरज कर न बरसो आप इतना भी गरज गरज कर न बरसो की मैं आंधी, तुफान या सैलाब बन जाऊं खैर, खैर, मुझमे तो अभी साख बाकी हैं आप टटोलना खुदको, अपनी फितरत को सच बोलूं? आप में वह पहले वाली बात कहां बाकी हैं

## निवडक

### जयकुमार गोरे प्रकरणात शरद पवार पक्षाचा हात



**मुंबई, दि.२५–** ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे एका महिलेला विवस्त्र फोटो पाठवल्याच्या आरोपांमुळे चर्चेत आले होते. त्या प्रकरणात कोर्टाकडून गोरे यांना दिलासा देखील मिळाला होता. मात्र त्यानंतर हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. काही दिवसांपूर्वी मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर आरोप करणाऱ्या महिलेवर खंडणी प्रकरणात पोलिसांनी अटकेची कारवाई केली. खंडणी घेताना पोलिसांनी महिलेला अटक केली होती. या सगळ्या प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार गटाच्या नेत्यांचा उल्लेख केला आहे.यावेळी त्यांनी खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांचाही उल्लेख केला.

## कारसह सोन्याचे दागिने, रोख रक्कम हस्तगत

# प्रवासी महिलेला लुटणाऱ्या वाहन चालकास काही तासात ठोकल्या बेड्या

**समाचार/नगर-दि.२५**

शहरातील पुणे बस स्थानक, स्वास्तिक चौक येथे कारमधून प्रवास करणाऱ्या महिलेकडील सोन्याचे दागिने, मोबाईल आणि रोख रक्कम लुटून तिला धक्का देत कारबाहेर ढकलून दिल्याची धक्कादायक घटना रविवारी (२३ मार्च) दुपारी एकच्या सुमारास घडली. मात्र, कोतवाली पोलिसांनी वेगवान तपास करत संशयित आरोपीला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून १२ लाख ५२ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख, कृष्णकुमार सेदवाड, कैलास कपिले, पोलीस अंमलदार विशाल दळवी, संदीप पितळे, सलिम शेख, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुरज कदम, सोमनाथ केकान, महेश पवार, सचिन लोळगे, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, राम हंडाळ, अमोल गाडे, सोमनाथ राऊत, प्रतिभा नागरे, राहुल गुंड्डू यांच्या पथकाने केली आहे.

नितीन अशोक गोसावी (रा. चिखली, जि. बुलढाणा) असे त्याचे नाव आहे. त्याच्याविरूध्द पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अनुराधा सोमेश्वर जगदाळे (वय ४३ रा. लोनार गल्ली, सर्जेपुरा) यांनी फिर्याद दिली आहे. रविवारी त्या शिक्रापुरहून खासगी प्रवासी वाहनातून प्रवास करत होत्या. स्वस्तिक चौक, पुणे बसस्थानकासमोर त्यांना उतरायचे होते. मात्र, त्या एकट्या असल्याचा (पान ३ वर)

## यंदा वाढीव पाणीपट्टी आकारता येणार नाही– चव्हाण

# वाढीव पाणीपट्टीची रक्कम बजेटमध्ये दाखवलीच नाही

**समाचार/नगर-दि.२५**

स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचा कडाडून विरोध असताना महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून आपला प्रशासकीय अधिकार वापरत पाणीपट्टीत वाढ केली. थोडी थिडकी नाही तर तब्बल ९०० रुपयांनी वाढ करून पंधराशेची २४०० केली. नगरकरांवर हा जिझिया कर आयुक्तांनी लादला. पण चालू बजेटमध्ये ही वाढीव पाणीपट्टी दाखवली गेलीच नाही त्यामुळे यावर्षी महापालिकेला वाढीव पाणीपट्टी आकारता येणार नाही, असे माजी नगरसेवक दीप चव्हाण यांनी म्हटले आहे.

पाणीपट्टीची डिमांड सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ३० कोटी करण्यात आली होती. आता चालू अर्थ संकल्पात ९०० रुपयांनी वाढ केलेली आहे .ती रक्कम ५ कोटी ३१ लाख रुपयांनी वाढते. परंतु आयुक्तांनी दि. १३ मार्च रोजी एका तासात स्थायी समिती आणि महासभा घेऊन पाणीपट्टी वाढीव जाहीर केली. नवीन अर्थसंकल्पात ३५ कोटी ३१ लाख रक्कम दाखवली गेली पाहिजे होती. प्रत्यक्षात ही रक्कम ३० कोटीच दाखवण्यात आली. त्यामुळे महापालिकेला ती वाढीव रक्कम वसूल करता येणार नाही. त्याबद्दल आयुक्तांचे आभार, असे दीप चव्हाण यांनी म्हटले आहे.आता बजेटमध्ये वाढीव पाणीपट्टीला मंजुरी घेतलीच नाही तर मग नियमाप्रमाणे पाणी पुरवठा विभागाला वाढीव दराने ती आकारण्याचा अधिकार उरत नाही.



२००३ मध्ये तत्कालीन नगरपालिकेची महापालिका झाली. तेव्हा पालिकेवर प्रशासक आला. त्यावेळी राजगोपाल देवरा यांनी पाणीपट्टी वाढवली. त्यावेळी ती आठशे रुपये होती. २०१६ मध्ये महापालिकेला राहुल द्विवेदी यांच्या रूपाने दुसरे प्रशासक लाभले. तेव्हा त्यांनी आपला (पान ३ वर)

## सुटीच्या दिवशीही वसुली कार्यालये सुरू राहणार

# १६,७२२ मालमत्ता धारकांनी घेतला शास्ती माफीचा फायदा

**समाचार/नगर-दि.२५**

महापालिकेने जानेवारी महिन्यापासून तीन टप्प्यात दिलेल्या शास्ती माफी योजनेमध्ये शहरातील १६,७२२ मालमत्ता धारकांनी ८ कोटी ८८ लाखांची सवलत घेऊन १७.१६ कोटींचा कर जमा केला आहे. शास्तीमध्ये ५० टक्के सवलत घेण्यासाठी अखेरचे सात दिवस शिल्लक राहिले आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी वसुली कार्यालये व भरणा केंद्र ३१ मार्चपर्यंत सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ थकीत कराचा भरणा करावा अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.



महापालिकेने ८ जानेवारी ते २१ फेब्रुवारी या कालावधीत १०० टक्के शास्ती माफ केली होती. तर, २२ ते २८ फेब्रुवारी या (पान ३ वर)

# कोयत्याचा धाक दाखवणाऱ्या युवकावर कारवाई

**समाचार/नगर-दि.२५**

शहरातील नालेगाव परिसरात एका तरूणाने कोयत्याचा धाक दाखवून दहशत केल्याची घटना घडली आहे. तोफखाना पोलिसांनी तातडीने कारवाई करत संशयितास ताब्यात घेतले असून त्याच्यावर भारतीय शस्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय दत्तु पवार (वय २७, रा. नेप्ती नाका) असे त्याचे नाव आहे. पोलीस अंमलदार गोरख धाकतोडे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. अंमलदार गोरख धाकतोडे आणि अंमलदार संजय करांडे हे रविवारी (२३ मार्च) दिवसा हद्दीत गस्त घालत असताना दुपारी १.५० च्या सुमारास त्यांना ठाणे अंमलदार यांनी फोनव्दारे माहिती दिली की, नालेगाव येथे एक तरूण कोयता हातात घेऊन लोकांना धमकावत आहे. माहिती मिळताच अंमलदार गोरख धाकतोडे व संजय करांडे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने संशयिताला ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव अक्षय दत्तू पवार (वय २७, रा. नेप्ती नाका) असल्याचे सांगितले.

# इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी

**समाचार/नगर-दि.२७**

इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात २३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची सरकारची योजना आहे. त्यामुळे येत्या सहा वर्षांमध्ये भरपूर नोकऱ्या मिळू शकतील.

इलेक्ट्रॉनिक क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने गुंतवणुकीची योजना आखली आहे. सरकारने इलेक्ट्रॉनिक घटक प्रोत्साहन योजनेला अंतिम रूप दिल्यामुळे सुमारे ९२ हजार लोकांना रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे.

**दुसरी मोठी योजना**

रोजगाराला चालना देण्यासाठी पीएलआसय'नंतर ही दुसरी योजना असेल. त्यात डिस्प्ले मॉड्यूल, सब-असेंब्ली कॅमेरा मॉड्यूल, प्रिंटेड सर्किट बोर्ड असेंब्ली, लिथियम सेल एन्क्लोजर, रेसिस्टर, कपॅसिटर आणि फेराइट्स यांचा समावेश असेल.



**रोजगाराच्या नव्या संधी**

देशात थेट नोकऱ्या वाढवण्याची केंद्र सरकारची योजना असून त्याअंतर्गत ही योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेमुळे सहा वर्षांमध्ये ९१ हजार ६०० थेट नोकऱ्या उपलब्ध होतील, अशी सरकारची अपेक्षा आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सरकार दर वर्षी २३०० ते ४२०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या योजनेत सामील होणाऱ्या सर्व कंपन्यांना उत्पादन आणि नोकरीचे उद्दिष्ट निर्धारित वेळेत पूर्ण करावे लागणार आहे.

**'पीएलआय' नंतर मोठी योजना**

'पीएलआय' योजनेनंतर घटक प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा यासाठी सरकार या योजनेकडे पाहत आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, देशात पल आणि सॅमसंगसारख्या मोठ्या टेक कंपन्या आहेत; परंतु त्यांच्याकडे देशांतर्गत मूल्यवर्धन १५-२० टक्के आहे. ते ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.

**तीन प्रकारे मिळणार प्रोत्साहन**

या योजनेअंतर्गत तीन प्रकारे प्रोत्साहन दिले जाणार असून पहिला ऑपरेशनल खर्चावर आणि दुसरा भांडवली खर्चावर अवलंबून असेल. त्याचबरोबर या दोघांची सांगड घालून तिसरे प्रोत्साहन दिले जाणार आहे. नेट इन्क्रीमेंटल सेलच्या आधारे त्यांना ऑपरेशनल इन्सेंटिव्ह दिले जाईल. त्याचबरोबर पात्र भांडवली खर्चाच्या आधारे भांडवली खर्च दिला जाणार आहे.

दानात असे हे श्रेष्ठ दान,
रक्तदान..
मानवाला मिळालेले
हेची आहे वरदान..



राष्ट्रसंत आचार्यसम्राट
पुज्य श्री आनंदऋषिजी महाराज साहेबांच्या
३३ व्या पुण्यस्मृति दिनानिमित्त
भव्य रक्तदान शिबीर
शुक्रवार, दि. २८ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ ते ५
स्थळ : भक्त निवास, आनंद धाम, अहिल्यानगर
प्रायोजक
अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि.
मर्चन्टस् बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे...
प्रधान कार्यालय : मार्केट यार्ड, अहिल्यानगर
0241 - 2322222 www.amcbank.in
संयोजक - धार्मिक परिक्षा बोर्ड * तिलोक आनंद मानव सेवा केंद्र * जैन श्रावक संघ
रक्तदान पवित्र कार्य आहे.. आपण ही करा व इतरांना ही सांगा..

# महिलांवरील अन्याय सहन करणार नाही : निंबाळकर



**समाचार/नगर-दि.२५**

जिल्ह्यातील महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रवादी महिला आघाडी पुढाकार घेणार असून आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली काम केले जाणार आहे. महिलांवर होणारा अन्याय कदापी सहन केला जाणार नाही, दैनंदिन जीवनामध्ये महिलांना येणाऱ्या अडचणी प्राधान्य क्रमाने सोडविल्या जाण्याचे काम महिला पदाधिकारी करतील. शासकीय कार्यालय येथे महिलांचे छोटे-छोटे प्रश्न असतात परंतु ते वेळेवर होत नाही. त्यांना अनेक वेळा हेलपाटे मारावे लागतात तसेच विद्यार्थिनीचा सुरक्षेतेचा प्रश्न देखील गंभीर आहे तो सोडवण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. आणि राज्य शासनाच्या विविध योजना महिलांसाठी असून त्याची जनजागृती केली जाईल यासाठी जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मोठ्या प्रमाणात केले जाईल असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर यांनी केले.

पाईपलाईन रोड येथे राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या नूतन पदाधिकारी यांचा सत्कार संपन्न झाला. यावेळी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर, उद्योजकअमोल कांडेकर, सुजाता कदम, स्मिता वाल्हेकर, संगीता ससे, वनिता ठोंबे, स्वाती पवार, रूपाली तांबोळी, कल्याणी गाडळकर, अंबिका भिसे, अश्विनी दळवी, अश्विनी झरेकर, स्नेहल दरंदले, टीना लालबेग, दिपाली आढाव, भारती दिवटे आदी महिला उपस्तिती होत्या.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये महिला आप-आपल्या क्षेत्रांमध्ये आघाडीवर असून आपले कर्तव्य सिद्ध करत आहे. समाजामध्ये वावरत असताना सर्वसामान्य महिलांचे विविध प्रश्न प्रलंबित असून ते सोडवण्यासाठी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाने पुढाकार घेऊन मिळालेल्या पदाचा उपयोग चांगल्या कामासाठी मार्गी लावावा आशाताई निंबाळकर ह्या चळवळीतील कार्यकर्त्या असल्यामुळे खऱ्या अर्थाने महिलांचे प्रश्न मार्गी लागले जातील असे मत अमोल कांडेकर यांनी व्यक्त केले.

# महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार गोरख भालके यांना प्रदान

**समाचार/नगर-दि.२५**

रिसीएल डॉट इन आणि समाचार वाणी न्यूजच्या अंतर्गत व महाराष्ट्र शसान रजिस्टर आणि रेकॉग्राईज् संस्थेच्या वतीने देण्यात येणारा महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार २०२५' अहिल्यानगर येथील पिंपळगाव पिसा गावचे युवा उद्योजक गोरख बाळासाहेब भालके यांना देण्यात आला. हा पुरस्कार त्यांना नाशिक येथे भव्य दिव्य कार्यक्रमात सिनेअभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सरकारी अधिकारी व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी संस्थेच्यावतीने सांगण्यात आले की, महाराष्ट्रात छोटे व्यवसाय सुरु करुन यशस्वी वाटचाल करणाऱ्या उद्योजकांना संस्थेच्या वतीने महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यामध्ये महाराष्ट्रातील विविध ६० उद्योजकांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यामध्ये अहिल्यानगर येथील पिंपळगाव पिसा गावचे उद्योजक गोरख बाळासाहेब भालके यांना पुरस्कार देण्यात आला. त्यांनी कमी वयात वडील नसतांना स्व:ताच्या हिमतीवर, कोणतेही आर्थिक भांडवल नसताना, उद्योग धंद्यात आधार नसणाऱ्या माणासाने महाराष्ट्रभर फर्निचर दुकानदारांना माल सप्लाय केला. आणि तो व्यवसाय ते यशस्वीपणे चालवत आहेत. त्यांचे आज अहिल्यानगर येथे कल्याणरोड आणि टिळकरोड येथे दोन फर्निचरच्या शाखा आहेत. बंगले प्लॅट ऑफिस या सारख्या ठिकाणी इंटिरियर फर्निचर बनवण्याचे काम करुन मोठा व्यवसाय त्यांनी उभा केला. त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

# आनंदधाम येथे २८ मार्चला भक्तिसंध्या कार्यक्रम

**समाचार/नगर-दि.२५**





राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आनंदधाममध्ये शुक्रवारी दि.२८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता प्रसिद्ध गायिका प्रियांका बर्वे व प्रसिद्ध गायक धवल चांदवडकर यांच्या भक्तिसंध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उमेश बोरा यांनी दिली.

ते म्हणाले, या भक्तिसंध्या कार्यक्रमाचे प्रायोजक महावीर ग्रुपचे राजेशजी संतोष भंडारी आणि सुराणा कॉर्नरचे संजय, संदीप कचरदास सुराणा, प्रतीक पारस चोरडीया आहेत. भक्तिसंध्येच्या कार्यक्रमात प्रियांका बर्वे आणि धवल चांदवडकर यांची एकापेक्षा एक सरस भक्तिगीते भाविकांना जवळून ऐकण्याचा आनंद घेता येणार आहे.

पुणे येथील प्रियांका बर्वे यांनी मराठीसह अनेक भाषांमध्ये गायन केले आहे. सा रे ग म प मुळे त्या लोकप्रिय झाल्या.

पुण्यातील उदयोन्मुख प्रतिभावान गायक धवल चांदवडकर हे पार्श्वगायक, कला दिग्दर्शक आणि संगीतकार म्हणूनही ओळखले जातात. पं.हेमंत पेंडसे, पं. रघुनंदन पणशीकर आणि पं.भवदीप जयपुरवाले यांच्याकडे त्यांनी गायनाचे धडे घेतले.

संगीत क्षेत्रात योगदान देत असलेल्या युवा कलाकार प्रियांका बर्वे आणि धवल चांदवडकर भक्तिसंध्या मैफिली निमित्ताने नगरकरांना भेटणार आहेत. रसिक नगरकरांनी या भक्तिसंध्या कार्यक्रमाचा आनंद मोठ्या संख्येने प्रत्यक्ष उपस्थित राहून घ्यावा असे आवाहन उमेश बोरा, गिरीश शींगी, सचिन भंडारी यांनी केले आहे.

# विखे अभियांत्रिकीत इलेक्सा २०२५ उत्साहात

**समाचार/नगर-दि.२५**





विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकतेच इलेक्झा २०२५ हा तीन दिवसीय तांत्रिक महोत्सव मोठया उत्साहात संपन्न झाला.

यावेळी मुख्य अतिथी संस्थेचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनिल कल्हापुरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उदय नाईक, ई अॅण्ड टी. सी.व्ही.एल.एस. आय.डिझाईन अॅण्ड टेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. अनिता पाटील उपस्थित होते.

प्रत्येक अभियांत्रिकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तांत्रिक अभ्यासासोबत विविध सह अभ्यासकम आणि अभ्यासे तर उपक्रमांचा देखील अनुभव घेण्याची आवश्यकता आहे, असे मनोगत व्यक्त करताना प्रा. सुनिल कल्हापुरे यांनी सांगितले.

या तीन दिवसीय तांत्रिक महोत्सवामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, वेब डिझाईनींग, पोएट्री, रांगोळी, स्केचींग आणि ड्राईंग या स्पर्धांमुळे मुलांचे डिझाईन कौशल्य आणि सर्जनशीलतेला वाव मिळतो. तसेच डिबेट स्पर्धेमुळे मुलांचे संवादकौशल्य, आंतरव्यक्ती कौशल्य, नेतृत्वकौशल्य, सादरीकरण, विश्लेषणात्मक आणि तार्किक कौशल्य यासारख्या विविध कौशल्यामध्ये वाढ होते. तसेच क्वीझ आणि पाल स्पर्धांमुळे मुलांची तार्किक विचारसरणी सुधारण्यास मदत होते. त्यांची माहिती साठविण्याची क्षमता, निर्णयक्षमता आणि विश्लेषणात्मक कौशल्य सुधारते. गेमींग स्पर्धेमुळे मुलांचा ताण कमी होणे, यशाची भावना निर्माण होणे आणि संज्ञात्मक कौशल्य सुधारते इ. विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. या महोत्सवामध्ये सर्व अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

सदर महोत्सवाचे समन्वयक म्हणून ई अॅण्ड टी.सी. विभागातील सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी काम पाहिले.

## अस्थिरोग तपासणी शिबिरास प्रतिसाद

# आरोग्य शिबिरे सेवेचे महाकुंभ- बोथरा



**समाचार/नगर-दि.२५**

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये वर्षभर विविध आरोग्य शिबिरे घेतली जातात.यामुळे सामान्य रुग्णांना दिलासा मिळत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये महाआरोग्य शिबिरांच्या मार्फत आरोग्य सेवेचा महाकुंभ च होत आहे.या महाआरोग्य शिबिरात सर्व प्रकारच्या आरोग्य विषयक तपासणी मोफत करून सवलतीच्या दरात रुग्णांना उपचार दिले जात आहेत.येथे येणारे रुग्णांना आपुलकीने, जिव्हाळ्याने,सेवाभावी वृत्तीने दिली जाणारी आरोग्य सेवा कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन उद्योजक सुवालाल बोथरा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३३ व्या पुण्यस्मृती दिना निमित्त स्व.सौ.शकुंतला सुवालालजी बोथरा यांच्या स्मरणार्थ सुवालाल बोथरा व बोथरा परिवाराच्या वतीने अस्थिरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी विनोद बोथरा,प्रमोद बोथरा,प्रकाश बोथरा,सुबोध बोथरा,मोहक बोथरा, कविता बोथरा, संगीता बोथरा,कल्पना बोथरा,सेजन बोथरा,रवीना बोथरा,सेजल बोथरा,महिमा बोथरा,सुधांशु बोथरा,कमलेश गुगळे,राजेश गुगळे,निखिल बोथरा

आदींसह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य संतोष बोथरा,सतिश लोढा,माणकचंद कटारिया,सुभाष मुनोत,अनिल मेहेर,डॉ.आशिष भंडारी,व्याख्याते नितीन लाठे, अतुल शहा,शिबिराचे तज्ञ डॉक्टर अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विशाल शिंदे, डॉ.रोहन धोत्रे,स्टाईन सर्जन डॉ.अमित सुराणा,डॉ.अक्षय गादिया आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, दरवर्षीप्रमाणे सुवालाल बोथरा व बोथरा परिवाराच्यावतीने आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या शिबिरासाठी सहकार्य केले जात आहे. रुग्णांना चांगल्या दर्जाची सेवा अल्पदरात मिळावी.यासाठी जैन सोशल फाउंडेशनचे सदस्य कार्य करीत आहेत.ना नफा ना तोटा हा उद्देश ठेवून आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवा कार्य अखंडपणे सुरू आहे. मोहक बोथरा, डॉ. अमित खुराणा, डॉ. विशाल शिंदे यांची भाषणे झाली. डॉ.आशिष भंडारी यांनी सुत्रसंचालन केले.अनिल मेहेर यांनी आभार मानले.

अस्थिरोग तपासणी शिबिरात २२२ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# तिघांची बेकरी चालकास मारहाण

**समाचार/नगर-दि.२५**

भिंगार उपनगरातील एम. जी. रस्त्यावरील दत्त बेकरीसमोर लावलेल्या दुकानाच्या फलकावरून झालेल्या वादातून तिघांनी मिळून बेकरी चालकाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनेश भाऊसाहेब कराळे (वय ३१, रा. सावतानगर, भिंगार) यांनी दिलेल्या जबाबावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल शिवनारायण भिडोरिया, गणेश शिवनारायण भिडोरिया आणि शिवनारायण भिडोरिया (तिघे रा. भिंगार) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे आहेत. फिर्यादी कराळे यांच्या बेकरीच्या समोर संशयित आरोपींनी त्यांच्या दुकानाचा फलक लावला होता. त्यामुळे ग्राहकांना ये-जा करताना अडथळा निर्माण होत असल्याने कराळे यांनी संशयित आरोपींना फलक हलवण्यास सांगितले.

यावरून वाद निर्माण झाला. वाद विकोपास गेल्यावर राहुल भिडोरिया याने शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. कराळे यांनी विरोध करताच गणेश भिडोरिया याने लाकडी दांडक्याने आणि शिवनारायण भिडोरिया याने लोखंडी रॉडने मारहाण केली. या मारहाणीत कराळे गंभीर जखमी झाले. अधिक तपास पोलीस अंमलदार एस. एस. शेख करत आहेत.

# एचडीएफसी बँक आणि इंडियन आर्मीचा प्रोजेक्ट नमन उपक्रम





भारतातील आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक एचडीएफसी बँक, इंडिया आर्मी आणि सीएससी ई-गव्हर्नन्स यांनी प्रोजेक्ट नमन - अ ट्रिब्यूट टू वेटरन्सचा २६ डायरेक्टरेट ऑफ इंडियन आर्मी वेटरन्स (डीआयएव्ही) स्थानांपर्यंत विस्तार करण्यासाठी सामंजस्य कराराचे नूतनीकरण केले आहे. प्रोजेक्ट नमनची रचना आर्मी वेटरन्स, त्यांच्या कुटुंबियांना आणि जवळच्या नातेवाईकांना मदत आणि सेवा प्रदान करण्यासाठी केली आहे.आर्मी वेटरन्स किंवा त्यांच्या कुटुंबियांना किंवा जवळच्या नातेवाईकांकडून चालवली जाणारी ही सीएससी केंद्रे संरक्षण आस्थापनांमध्येच त्यांच्या दाराशी पेन्शनशी संबंधित सेवा, सरकार ते नागरिक (जी२सी) सेवा आणि व्यवसाय ते ग्राहक (बी२सी) सेवा देण्यासाठी समर्पित आहेत. एचडीएफसी बँक लिमिटेड (परिवर्तन कार्यक्रमांतर्गत), इंडियन आर्मीचे डायरेक्टरेट ऑफ इंडियन आर्मी वेटरन्स (डीआयएव्ही) आणि सीएससी अकादमी यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य कराराचे (एमओयू) नूतनीकरण करण्यात आले.एचडीएफसी बँकेच्या अल्टरनेट बँकिंग चॅनेल्स अँड पार्टनरशिप्सचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि व्यवसाय प्रमुख सत्येन मोदी, सीएससी अकादमीचे सीईओ आणि ब्रिगेडियर, भारतीय सैन्याच्या माजी सैनिकांचे संचालक प्रवीण चांदेकर यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

## अतुल ग्रीनटेक आणि हिंदुस्थान पेट्रोलियमचा ईव्ही उपलब्धतेसाठी करार

भारतातील इलेक्ट्रिक मोबिलिटीची व्याप्ती विस्तारण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलत अतुल ग्रीनटेक प्रायव्हेट लिमिटेड (एजीपीएल) या अतुल ऑटो लिमिटेडच्या उपकंपनीने हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) कंपनीसारख्या भारत सरकारच्या नामवंत कंपनीसह क्रांतीकारी भागिदारी केल्याचे जाहीर केले आहे. या भागिदारीअंतर्गत एजीपीएल आपली अत्याधुनिक इलेक्ट्रिक तीन चाकी वाहने - एनर्जी आणि एनर्जी२ एचपीसीएलच्या विस्तारित एचपी गॅस वितरक नेटवर्कद्वारे उपलब्ध करून देत देशातील शाश्वत वाहतूक क्षेत्रात लक्षणीय पाऊल उचलणार आहे.

भारतातील घराघरात पोहोचलेले एचपीसीएल हे नाव कच्च्या तेलाचे शुद्धीकरण आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या विपणन क्षेत्रात आघाडीवर असून त्यात लिक्विफाईड पेट्रोलियम गॅसचाही समावेश आहे. एचपी गॅस वितरकांच्या विस्तारित नेटवर्कच्या माध्यमातून एचपीसीएल लाखो देशांतर्गत आणि व्यावसायिक ग्राहकांना विश्वासार्ह सेवा आणि वितरण पुरवत आहे. ही नवी भागिदारी एचपीसीएलच्या एलपीजी वितरण यंत्रणेचा विश्वास आणि व्याप्तीचा वापर करत एजीपीएलच्या नाविन्यपूर्ण ईव्ही सुविधा देशभरातील ग्राहकांना सहज उपलब्ध करून देईल.

**लोकार्थ**

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## शब्दखेळ - ३३७

खाली दिलेल्या चौकोनात भारताचे सुप्रसिध्द विनोदी कलाकाराचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | ज | टो | म | टो | ब | अ | ल |
| टा | जो | बॉ | जी | डू | ज्ञ | ग | प |
| णा | सा | क | ई | ब | भा | र | ण |
| स | य | सु | प | ट | ऊ | ना | य |
| ना | धू | री | स | र | कु | म | आ |
| क | शे | मे | मी | लु | मो | सा | ले |
| दा | ड | थी | त | आ | का | ळी | बी |
| जे | ती | ख | ट | खा | प | नी | टे |

**शब्दखेळ - ३३६ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मे | स | ता | द्र | र | आ | रू | ळ |
| घ | प | खो | र्द | इं | ट | श्ते | दा |
| आ | क | मे | ब्ब | कृ | अं | के | का |
| क | शो | नी | दा | अ | रा | ळी | घ |
| अ | र | र | श | जू | ब्द | ण | न |
| स | पा | द | धी | का | र | आ | र |
| बु | ट्या | ना | दो | चौ | दा | ते | रा |
| र | ज | भ | द | र | प | यो | वा |

उत्तर - तारा भवाळकर

अरूण जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन

## युवकांनी रक्तदानाची लोक चळवळ उभारावी- आयुक्त

**समाचार/नगर-दि.२**

रक्तदान शिबीर ही काळाची गरज बनली असून युवकांनी पुढे येऊन रक्तदानाची लोक चळवळ उभी करावी. मा.आमदार अरुणकाका जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या २१ वर्षापासून रक्तदान शिबिराचा सुरू असलेला सामाजिक उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.



माजी आमदार अरुण जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे उद्घाटन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी स्थायी समिती सभापती कुमारसिंह वाकळे,अविनाश घुले, मनोज कोतकर, प्रा.माणिक विधाते, सुंतीलाल कोठारी, माजी नगरसेवक संजय चोपडा, निखिल वारे, प्रकाश भागानगरे, उद्योजक राजेश भंडारी, ज्ञानेश्वर राजकर, दीपक सूळ, विजय गव्हाळे, अरविंद शिंदे, विपुल शेटीया, कमलेश भंडारी, मनोज साठे, किरण भंडारी, संतोष बोरा, रेश्माताई आठरे, आशाताई निंबाळकर, संतोष लांडे, संभाजी पवार, बाबुशेठ लोढा, सुनील रामदासी, दत्तापाटील सप्रे, माधव लामखडे, वैभव वाघ, मंगेश खताळ आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

समाजामध्ये नव-नवीन आजार उद्भवताना दिसत आहे. तसेच अपघाताचे प्रमाण वाढले असल्यामुळे रुग्णांना मोठ्या प्रमाणात रक्ताची गरज भासत असते, रक्त वेळेवर न मिळाल्यास एखाद्या रुग्णाचा दुर्दैवी मृत्यू होत असतो. यामुळे रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी सामाजिक संस्था, युवक यांनी पुढे येऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरांचे आयोजन करणे गरजेचे आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून आपण समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून आपले कर्तव्य पार पाडावे. कोरोना संकट काळामध्ये जनतेला आव्हान केल्यानंतर नगरकरांनी पुढे येऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान केले असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

अरुण जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते यावेळी आमदार संग्राम जगताप व जिल्हा परिषद माजी सदस्य सचिन जगताप वडिलांच्या वाढदिवसानिमित्त २१ वर्षापासून रक्तदान करत असतात. यावेळी काकांवर प्रेम करणारे कार्यकर्ते व महिलांनी देखील मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरामध्ये भाग घेतला.

## आर्किटेक्ट, इंजिनिअर्स संघटनेतर्फे आ. जगताप यांचा सत्कार



**समाचार/नगर-दि.२**

महापालिकेत येणाऱ्या अडचणीबाबत विधानसभेच्या अधीवेशनात प्रश्न मांडल्याबद्दल आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हे अर्स असो च्या वतीने आ.संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार संग्राम जगताप यांनी अहील्यानगर मधील विविध प्रश्न उपस्थित केले यामध्ये शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना चांगल्या सुविधा व नव्या कामांसाठी महापालिकेत टेक्निकल स्टाफ नियुक्तीची आवश्यकता झाली आहे. त्याबाबत सरकारने नवीन अधिकारी भरतीस परवानगी द्यावी. नगर रचना विभागातील तक्रारी वाढत असून विभागातील फाईल कधीच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तडजोडी शिवाय पुढे जात नाही. बहुमजली इमारती शहरात उभ्या राहत असून महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडे बहुमजली इमारतीची आग आटोक्यात आणण्यासाठी यंत्रणा नाही! अधिकारी संख्या मर्यादित असून एखादी आग लागण्याची दुर्दैवी घटना घडली तर महापालिकेची यंत्रणा अपुरी आहे. त्यामुळे अग्निशमन विभागाकडे अत्याधुनिक यंत्रणा असणे आवश्यक आहे. असे विविध प्रश्न आमदार जगताप यांनी या अधिवेशनात उपस्थित केले.

महापालिकेत तांत्रिक कर्मचाऱ्यांची गरज असून भ्रष्टाचार मुक्त कारभार महापालिकेतील नगर रचना विभागात आवश्यक असल्याचे नमूद करून आमदारांनी सभासदांच्या प्रश्नांना वाचा फोडली असून याबाबत लवकरच योग्य पाऊले उचलली जावून मार्ग निघेल अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली.

यावेळी संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, उपाध्यक्ष विनोद काकडे, खजिनदार भुषण पांडव, सुनिल औटी, प्रदिप तांदळे, यश शहा, सुनिल औटी, विजयकुमार पादिर, सचिन डागा, प्रितेश कांकरिया आणि संचालक उपस्थित होते.

### पान १ वरुन

#### वाहन चालकास काही तासात ठोकल्या बेड्या

गैरफायदा घेत वाहन चालकाने त्यांचे गळ्यातील दीड तोळ्याचे मिनी गंठण जबरदस्तीने घेतले, तसेच पर्स, मोबाईल आणि रोख अडीच हजार रूपये घेऊन त्यांना वाहनातून बाहेर ढकलले आणि वाहन घेऊन पळ काढला. या प्रकारामुळे त्या प्रचंड घाबरून आणि त्वरित कोतवाली पोलीस ठाणे गाठून माहिती दिली. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने वाहनाचा क्रमांक (एमएच २८ बीडब्लू ९६३२) मिळवण्यात आला. पोलिसांनी गोपनीय बातमीदारांना सतर्क करून वाहनाचा माग काढला. सदर वाहन छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी नाकाबंदी केली. अखेर पांढरी पुलाजवळ वाहनाचा पाठलाग करून संशयित आरोपी नितीन अशोक गोसावी (रा. चिखली, जि. बुलढाणा) याला ताब्यात घेतले. त्याच्या वाहनातच अनुराधा यांची पर्स, मोबाईल आणि रोख रक्कम सापडली. त्याच्या ताब्यातून १ लाख ४० हजार रूपये किमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण, १० हजार रूपये किमतीचा मोबाईल, अडीच हजार रूपये रोख आणि गुन्ह्यात वापरलेली ११ लाख रूपये किमतीची कार असा एकूण १२ लाख ५२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

#### वाढीव पाणीपट्टीची रक्कम बजेटमध्ये दाखवलीच नाही

अधिकार वापरून ८०० ची पाणीपट्टी पंधराशे केली. आता तिसऱ्यांदा प्रशासक यशवंत डांगे लाभले. तेव्हा १२ मार्च २५ रोजी ती वाढवली. वास्तविक हा ठराव पालिकेच्या महासभा क्रमांक ३१, प्रशासक ठराव क्रमांक १०८, हा दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजीच मंजूर करण्यात आला पण या उल्लेख कोठेच नाही. १२ मार्च रोजी झालेल्या दोन्ही सभांमध्ये याची वाच्यता झालेली नाही. तसेच या सभेच्या प्रोसिडिंगमध्ये फक्त आयुक्तांनी ठराव मांडला आणि तो बहुमताने मंजूर झाला. पण याचे खंडन किंवा समर्थन,सदस्यांच्या मत मतांतराचा उल्लेख यात नाही. या दिवशी अजेंडा महापालिका सर्वसाधारण सभेचा काढला आणि त्यातच स्थायी समितीची पण मंजुरी घेतली हे कसे एकाच दिवसात शक्य होते, असा सवाल दीप चव्हाण यांनी केला आहे.

#### १६,७२२ मालमत्ता धारकांनी घेतला शास्ती माफीचा फायदा

कालावधीत ७५ टक्के सवलत देण्यात आली होती. मार्च अखेरपर्यंत शास्तीमध्ये ५० टक्के सवलत दिली जात आहे. सवलत काळात थकबाकीदार करदात्यांनी ८.८८ कोटींची सवलत घेऊन १७.१६ कोटींचा कर जमा केला आहे. त्यामुळे एकूण थकबाकीपैकी २६.०७ कोटींची वसुली झाली आहे. चालू आर्थिक वर्षात सुमारे ७७ कोटींची वसुली झाली आहे. अखेरच्या सात दिवसांत अधिकाधिक वसुली करण्यात येणार आहे. त्यासाठी थकबाकीदारांवर कारवाई करण्यात येत आहे.नागरिकांना अद्यापही ५० टक्के सवलत घेण्याची संधी आहे. ही अखेरची संधी असून या नंतर शास्तीमध्ये सवलत दिली जाणार नाही. त्यामुळे नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ थकीत कर भरावा. नागरिकांच्या सोयीसाठी शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी कर भरणा केंद्र सुरू राहणार आहेत. कर न भरल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचे डांगे यांनी सांगितले.दरम्यान, आढावा बैठकीत डांगे यांनी वसुली विभागाला कर वसुलीसाठी कठोर भूमिका घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. थकबाकीदारांपर्यंत जाऊन त्यांना सवलतीचा लाभ देऊन कर वसूल करावा, कर न भरल्यास कारवाई करावी, असे आदेश त्यांनी दिले आहेत.

## रामकृष्ण कांबळेंच्या कलाकृतीचे कोहिनूर मॉल येथे प्रदर्शन

**समाचार/नगर-दि.२५**

अहिल्यानगर मधील कोहिनूर मॉल येथे मनपसंत खरेदी, मनोरंजनाबरोबरच स्थानिक प्रथीतयश व नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. चित्रकला प्रदर्शन, अनुभवींचे मार्गदर्शन असे विविध उपक्रम मॉलमध्ये सुरु आहेत. याअंतर्गत पुण्यातील नामवंत कलाकार रामकृष्ण कांबळे यांच्या चित्राकृतींचे प्रदर्शन दि. २२ ते ३० मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. कलाकार कांबळे पुण्यातील अभिनव कला महाविद्यालयात ३६ वर्ष चित्रकला विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते, जे जे आर्ट गॅलरी, मुबई , बालगंधर्व कला दालन पुणे अश्या बऱ्याच ठिकाणी त्यांची कला प्रदर्शने झाली आहेत, कोहिनुर कलाविष्कार ४ या शृंखलेत रामकृष्ण कांबळे यांचे कला प्रदर्शन होत आहे. कांबळे यांच्या खास कलाकृती प्रथमच नगरमध्ये प्रदर्शनात असून नगरकर रसिक, कलाप्रेमीं व कलासंग्राहकांसाठी ही मोठी पर्वणी ठरणार आहे.

कोहिनूर कलाविष्कार अंतर्गत आतापर्यंत तीन प्रदर्शन झाली आहेत. प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या कला प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यामध्ये आतापर्यंत अशोक डोळसे, विकास कांबळे, बालाजी वल्लाळ, सचिन घोडे, सत्यम लुणिया,जयेश काळे, प्रशांत सोमवंशी, रणजीत थोरात, दीपाली व हेमांगी परमार, मुकुंद राऊत, महावीर सोनटक्के, अविनाश सोनवणे, अव्दैती सोलंकी, गौरव भोसले अशा अनेक कलाकारांच्या कलाकृतींना व्यासपीठ मिळाले आहे. खडू शिल्प, शिल्पकला, स्क्रॅप आर्ट, पेंटिंग, कॅलिग्राफी, वारली पेंटिंग अशा अनेक कला प्रकारांना याठिकाणी स्थान दिले जाते. कलाप्रेमी नगरकरांनी २२ मार्च पासून आयोजित रामकृष्ण कांबळे यांच्या कला प्रदर्शनास भेट द्यावी तसेच कोहिनूर कलाविष्कार अंतर्गत आयोजित केलेली हे प्रदर्शन निशुल्क असून सर्वासाठी खुले आहे, या प्रदर्शनाचा कलारसिक, विद्यार्थी व कला संग्राहक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन कोहिनूर मॉलच्या वतीने करण्यात आले आहे.



## सरोज आल्हाट यांना कृतिशील आदर्श साहित्यिक पुरस्कार प्रदान

**समाचार/नगर-दि.२५**

कवयित्री, मुक्त पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्या सरोज आल्हाट यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय कृतिशील आदर्श साहित्यिक पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त पार पडलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात सरोज आल्हाट यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी यशवंत सेनाचे सरसेनापती माधव गडदे, शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, जिल्हाध्यक्ष विजय तमनर आदी उपस्थित होते. सरोज अल्हाट यांना यापूर्वीही राष्टीय व राज्य पातळीवरील अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. सदर पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## भुईकोट किल्ल्याच्या सुशोभिकरणासाठी आलेल्या ५५ कोटींचे काय झाले?-देवगांवकर

**समाचार/नगर-दि.२५**

शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या सुशोभिकरणासाठी आलेल्या ५५ कोटी रूपयांच्या निधीचे काय झाले? असा प्रश्न उपस्थित करत मुकुंद देवगांवकर यांनी यासंदर्भांत जिल्हा प्रशासनाकडे माहिती मागवली आहे. त्यांनी म्हटले की, भुईकोट किल्ल्याच्या सुभोभिकरणाचा गाजावाजा ठराविक वर्षानंतर करण्यात येतो. मात्र, सुशोभिकरणासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी अन्बलगन यांच्या कार्यकाळात ५५ कोटी रूपयांचा निधी आला होता. सुशोभिकरणाच्या नावाखाली त्यावेळी होत असलेला खर्च संशयास्पद व वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. सदरचे काम अर्धवट झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यासाठी आलेला ५५ कोटी रूपयांचा निधी कोठे गेला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. भारतीय नागरिक व करदाता असल्याने शासनाचा प्रत्येक रूपया कोठे खर्च झाला, हे विचारण्याचा हक्क घटनेने प्रत्येक नागरिकाला दिला आहे. त्या हक्कानुसार मागील ५५ कोटी रूपयांचा निधी व इतर पैशांचा सविस्तर अहवाल तसेच नुकत्याच जाहीर झालेल्या २५ कोटीच्या निधीतून सुशोभिकरणाची कोणती कामे करण्यात येणार आहेत, याची माहिती द्यावी, अशी मागणी देवगांवकर यांनी केली आहे.

भगवान महावीर व्याख्यानमाला; पुष्प चौथे

## आई-वडिलांसोबतचे कनेक्शन सुधारण्याची गरज- प्रा. लाठे

**समाचार/नगर-दि.२५**



आपले आई-वडिलांशी अतुट नाते कायम असले पाहिजे. त्यांच्याजवळ जाऊन घट्ट मिठी मारता येईल असे स्नेहबंध आई-वडिलांशी असले पाहिजेत. आजच्या पिढीने आई-वडिलांसोबतचे कनेक्शन सुधारण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन लेखक प्रो.नितीन लाठे (मुंबई) यांनी केले.राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनने प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प 'आयुष्याचे गणित' या विषयावर गुंफताना आनंदधाममध्ये ते बोलत होते. व्याख्यानमालेचे मुख्य प्रायोजक जयकुंवरबाई मोतीलाल लोढा यांच्या स्मरणार्थ मनिषा निखिलेंद्र लोढा आणि लोढा परिवार आहेत. मनिषा लोढा व कुंदन कांकरिया यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. सरोजताई कटारिया यांनी सूत्रसंचालन केले.

लाठे म्हणाले, आपल्याला जन्म देणारी आई प्रेमस्वरूप असते आणि वडिल शक्तिस्वरूप असतात. आईचे प्रेम आणि वडिलांची शक्ती ज्यांच्या सोबत आहे त्यांना जीवनातील आनंद सहजपणे मिळत राहातो. एकत्र कुटूंबाची आपली परंपरा आहे. अलिकडे कुटूंब विभक्त झाली तरी वर्षमधून एकदा आपल्या परिवारातील सर्वांना एकत्र आणून देवदर्शन करावे. निसर्गात रमावे. परिवारासोबतचा आनंद अवर्णनीय असतो जो इतर कोणाच्याही सोबत राहून मिळवता येत नाही. आपला परिवार आपल्याला आत्मविश्वास देतो. आपलेपणाचे ऋणानुबंध अधिक दृढ करतो. सुखात सगळेच जवळ येतात. दुःखात आपला परिवारच आपल्या सोबत असतो. नातेसंबंध चांगले रहाण्यासाठी आपलेपणाने स्तुती करा. आपण कोणाला दुखावले तर लगेच माफी मागा. आजच्या भाषेत सांगायचे म्हणजे 'स्तुती करा' आणि 'माफी मागा' हे दोन ॲप आपल्या जीवनात डाऊनलोड करून ठेवा. आपले आयुष्य आनंददायी होत असल्याचे अनुभवाल. मीपणा कायम बाजूला ठेवा. आपले जीवन केव्हा संपणार? हे माहित नसते म्हणून सॉरी-थॅंक्यू लगेच म्हणत जा. आपल्या भावना व्यक्त करायला शिका. आई-वडिल देवाघरी गेल्यावर मी आई-वडिलांची काळजी घ्यायला हवी होती, असे वाटून पश्चात्ताप यायला नको. आपल्याला निरपेक्षपणे जीव लावणाऱ्या चांगल्या मित्रांच्या संपर्कात रहा. आपला कोठे अपमान झाला. आपण कोठे हरलो. आपल्या हातून पाप घडले तर हे सांगायला चांगला मित्र सोबत हवाच. स्वतःसाठी वेळ काढा. देवाच्या इच्छेशिवाय या विश्वातील पानही हलत नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घ्यावी.

हरी सुंदर नंद मुकुंद हरी नारायण हरी ओम...या भक्तीगातासोबत भजन गात लाठे यांनी व्याख्यानाचा समारोप केला. संगीताच्या साथीने झालेल्या भजनावर उपस्थितांनी टाळ्या वाजवत चांगलाच ठेका धरला. शहरासह उपनगरातील ज्येष्ठ स्त्री-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिमरन मुनोत यांनी आभार मानले.

## पाच वर्षाच्या अलहान जरीवालाचा रोजा

**समाचार/नगर-दि.२५**



पवित्र रमजान महिन्यात आपल्या जीवनाच्या पहिला रोजा पूर्ण करून फक्त पाच वर्ष वय असलेल्या अलहान अलतमश जरीव-ला याने रमजानच्या २१वा रोजा करून आपल्या जीवनातील पहिला रोजा ठेवला. पहाटे पासून १२ ते १४ तास म्हणजे संध्याकाळपर्यंत पाणी व अन्न काही न घेता पवित्र रोजा केला जातो. या चिमुकल्याने प्रचंड खडक उन्हाळा असतानाही यशस्वीरित्या पवित्र रोजा केला. याबद्दल सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे. अलहान हा सामाजिक कार्यकर्ते सलीमभाई जरीव-ला यांचा नातू व अ.नगर राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्याकचे शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांच्या मुलगा आहे.

न्याय व्यवस्थेची दोनशे वर्षपूर्ती

## विविध कार्यक्रम, व्याख्यानमालेचे आयोजन

**समाचार/नगर-दि.२५**



अहमदनगर जिल्हा न्याय व्यवस्थेला २०० वर्षेपुर्ण झाल्याबद्दल अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट् बार असोसिएशन, अहमदनगर यांनी व्याख्यानमला, आमंत्रित मान्यवरांचे सत्कार व स्मरणिकेचे प्रकाशन असे विविध कार्यक्रम आयोजीत केलेले आहेत. सदर कार्यक्रमाला सुप्रिम कोर्ट ऑफ इंडियाचे जेष्ठ (कॉलेजीयम मेंबर) न्यायमुर्ती अभय ओक यांचे भारतीय राज्यघटना व पर्यावरण या विषयावर तसेच दुसरे सुप्रिम कोर्टाचे न्यायमुर्ती प्रसन्नजी वराळे हे भारतीय राज्य घटना व ७५ वर्षेयांचे या विषयावर व्याख्यान होणार आहेत.

दोनही न्यायमुर्ती हे विषयांची संपुर्ण मांडणी मराठी भाषेत करणार आहेत. याच कार्यक्रमास याच जिल्ह्यातील उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय, विविध न्यायलयात कार्यरत असलेल्या जिल्हयातील व शहरातील न्यायाधिशांचा सत्कार समारंभ आयोजीत केला आहे. यातील प्रमुख सत्कार न्यायमुर्ती उर्मीला जी फलके, न्यायमुर्ती बी.जी. कोळसे पाटील, न्यायमुर्ती व्ही.एन. दाभोळकर, न्यायमुर्ती एस.बी. देशमुख, न्यायमुर्ती साधना जाधव, न्यायमुर्ती फणसाळकर, न्यायमुर्ती विनय जोशी, न्यायमुर्ती एस.जी. शिवलीकर इत्यादी मान्यवरांचा सत्कार या निमित्ताने आयोजीत केलेला आहे. या कार्यक्रमा मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे पालक न्यायमुर्ती विभाजी कंकणवाडी, न्यायमुर्ती संतोष चपळगावकर व जिल्हा न्यायालयाचे प्रधान जिल्हा न्यायाधिश अंजु शेंडे यांची प्रमुख उपस्थिती रहाणार आहे.

# जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारं

## कार्यक्षम व कणखर नेतृत्व

मा.श्री.

# अरुणकाका जगताप

आपणांस वाढदिवसाच्या
खुप खुप शुभेच्छा!



MAHAVIR GROUP
YOUR VISION, OUR REALTY

**श्री. राजेश संतोष भंडारी**